नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. भाऊजी दप्तरी स्मृति
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

संस्कृत साहित्यशास्त्रांतील
कांही स्थळांवर ओझरते विचार — गों. श्री. वनहट्टी
प्राचीन विदर्भाचें काव्य : कांही शंका — 'अप्रबुद्ध'
मराठी पद्यवाङ्मयाचे कांही प्रकार — पां. कृ. सावळापूरकर

ग्रंथसमालोचन : डॉ. केदार यांचें चरित्र, ललित कलेच्या सहवासांत, दुर्गादर्शन आणि कांही कविता, पानोळच्या, वाकळ, सावली, उन्मीलन, टिळक आणि आगरकर, बनगरवाडी, भिल्ल वीर कालिंग, दोन बहिणी, संतवाणीचा अमृतकलश, श्रीहरिविजयसार, महाराष्ट्र गीतें, कल्पनेचा खेळ व वर्षा या पुस्तकांवर अभिप्राय.

याशिवाय संघवार्ता, परीक्षा समितिवृत्त वगैरे.

११ संपादक : सप्टेंबर १९५६
६ पां. कृ. सावळापूरकर किंमत आठ आणे

श्री विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभूः

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष ११ वें अंक ६ वा

सप्टेंबर १९५६

संपादकीय

टिळक आगरकर विशेषांकाचें स्वागत वाचकवर्गाकडून फार चांगलें झालें, याबद्दल समाधान वाटतें. ज्या ज्या हित-चिंतकांनी प्रत्यक्ष भेटून वा पत्रद्वारा त्या अंकाबद्दल धन्योद्‍गार काढले त्यांचे आम्ही आभारी आहोंत. त्यांची 'सक्रिय' कृपादृष्टि 'युगवाणी'वर अशीच राहो ही प्रार्थना.

शासन साहित्य परिषद

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने या प्रांतांतील प्रसिद्ध व हस्तलिखित अशा दोन्ही प्रकारच्या ग्रंथांस व ग्रंथकारांस जो पुरस्कार देण्याचें ठरविलें त्याबद्दल आम्ही शासन साहित्य परि-षदेचे जाहीर अभिनंदन करीत आहोंत. लता आणि वनिता यांना कदाचित् सध्या आश्रयाची गरज राहिली नसेल, पण पंडितांना मात्र ती केवळ शोभेसाठीच नव्हे तर जीवनासाठीहि अजून आहे, यांत दुमत होण्यासारखें नाही. आणि राजाश्रया-सारखा निश्चित आणि उदार आश्रय दुसरा कोणता असणार ? हिंदुस्थानच्या सध्याच्या लोकशाहींत विद्याव्यासंगाची कदर होण्याचा संभव कमी आहे अशी सार्थ भीति अनेकांना वाटते. पण शासन साहित्य परिषदेच्या निर्णयाने ही भीति येवढयापुरती तरी निर्मूल आहे असें म्हणावयास हरकत नाही. विक्रमभोजा-दिकाच्या काळांतच आपण आहोंत असा स्वराज्याचा खरा प्रत्यय या निर्णयाने क्षणकाळ तरी येत आहे हेंहि फार चांगलें आहे.

या निमित्ताने ज्या ग्रंथकर्त्यांना पुरस्कार मिळणार आहे त्या समग्र पंडितांचेंहि आम्ही अभिनंदन करतों. कविभूषण खापर्डे यांच्यासारख्या वृद्ध पंडितापासून तों प्रा. डोळके यांच्या-सारख्या तरण्याबांड अभ्यासकापर्यंत सर्वांचा यथोचित परामर्ष घेतला गेला, ही आनंदाची गोष्ट आहे. हे सर्व मानवाईक नव्या अभ्यासकास नवी स्फूर्ति उत्पन्न करोत हीच इच्छा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म. म. वा. वि. मिराशी

या निमित्ताने शासन साहित्य परिषदेने भारत वर्षातील एक अग्रगण्य प्राच्यविद्यापंडित महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांचा सन्मान करण्याचें ठरविलें, याबद्दल परिषद आणि महामहोपाध्याय या दोघांचेंहि आम्ही विशेष अभिनंदन करतों. विद्वज्जनपरिश्रम जाणावयाला देखील कांही योग्यता लागते. ती योग्यता परिषदेने निःसंशय दाखविली आहे. सिद्ध विद्वानांचा त्यांच्या जिवंतपणीं सत्कार होण्याचे प्रसंग क्वचितच येतात. तसा तो प्रसंग लाभला याचा आनंद विशेष आहे. म. म. मिराशी यांना या सत्काराची स्पृहा नाही याची आम्हाला माहिती आहे. तरीहि विद्वानांच्या ऋणांतून मुक्त होण्याचें आमचें कर्तव्य आहे तें सत्काराच्या रूपाने केलेंच पाहिजे. म. म. मिराशी यांना आयुरारोग्य लाभून त्यांच्या हातून संशोधनाचें व प्राचीन इतिहासलेखनाचें कार्य अधिकाधिक होत राहो, अशी परमेश्वरास प्रार्थना आहे.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी	—श्री द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	–कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्कृत साहित्यशास्त्रांतील कांही स्थळांवर ओझरते विचार

प्रा. गो. श्री. वनहट्टी

संस्कृतांतील साहित्यशास्त्राच्या कांही मान्य ग्रंथांचें वाचन करत असतांना मनांत उद्भवलेले कांही विचार सर्वसामान्य वाचकांच्या व अभ्यासकांच्याहि दृष्टींतून वाचनीय ठरतील असें वाटल्यांने ते या लेखाद्वारें प्रकट करण्याचें धाडस करीत आहे.

१. काव्यप्रकाश. मम्मटाचार्यानें 'काव्यप्रकाश' ग्रंथांत एकदेशविवर्ति रूपकाचें उदाहरण म्हणून पुढील श्लोक दिला आहे.

यस्य रणान्तःपुरे करे कुर्वतो मण्डलाग्रलताम् ।
रससम्मुख्यपि सहसा पराङ्मुखी भवति रिपुसेना ।

(जेव्हा रणरूपी अन्तःपुरांत तो हातांत वाकडें खड्ग घेतो तेव्हा शत्रुसेना (वीर-) रसासाठी उत्सुक असूनहि एकदम पाठमोरी होते.)

या श्लोकांत रणांगण व अन्तःपुर यांतील साधर्म्य स्पष्टपणे दाखविलें आहे. खड्ग व नायिका (आवडती) आणि रिपुसेना व प्रतिनायिका (नावडती) यांतील साधर्म्य मात्र अर्थसामर्थ्यावरून कळतें. कारण आवडतीला जवळ घेतल्यावरोवर नावडती दूर पळते हें अन्तःपुरांतील दृश्य व त्याच्याशीं साधर्म्य असलेलें राजानें तलवार हातीं घेतल्यावरोवर शत्रुसैन्य पळत आहे हें रणांगणावरील दृश्य हीं दोन्हीं लक्षांत घेतलीं तरच रण व अन्तःपुर यांतील साधर्म्याची पूर्ण खुमारी कळते.

येथे प्रश्न हा उद्भवतो की या श्लोकांतील अलंकाराला उपमा म्हणायचें की रूपक ? उपमा व रूपक यांच्या अनेक प्रकारांपैकी दोन प्रकारांचें क्षेत्र सारखेंच आहे. ते प्रकार म्हणजे उपमान व उपमेय यांचा समास जींत असतो ती धर्मवादिलुप्ता (दोघांमधील साधारण धर्म आणि वा इत्यादि उपमाप्रतिपादक शब्द यांचा लोप झालेला असून फक्त उपमान व उपमेय यांचेंच विधान असलेली उपमा) आणि उपमान व उपमेय यांचा समास असलेलें एकदेशविवर्ति रूपक हे होत. उपमान–उपमेय यांचा समास असून इतर वर्णन प्रामुख्यानें उपमेयाला व अप्रत्यक्षपणे उपमानाला लागू पडत असल्यास ती उपमा व तें प्रामुख्यानें उपमानाला आणि अप्रत्यक्षतः उपमेयाला लागू पडत असल्यास तें रूपक असा या दोहोंतील व्यवच्छेदक दण्डक आहे. उदाहरणार्थ, 'मुखचन्द्रः हसति' ही उपमा पण 'मुखचन्द्रः प्रकाशते' हें रूपक होय. 'मुखचन्द्रः शोभते' अशा ज्या वाक्यांतील वर्णन उपमान व उपमेय या दोहोंना सारखेंच लागू पडतें त्या ठिकाणीं दोन्हीहि अलंकार होऊं शकतात. हा दंडक पूर्णपणें वस्तुनिष्ठ असल्यानें या दोन अलंकारांत भेद करण्यास फार उपयोगी पडतो.

या दंडकाप्रमाणे पाहिलें तर 'काव्यप्रकाशां'तील उपरिनिर्दिष्ट श्लोकांतील अलंकार रूपक नसून उपमा आहे असें दिसून येतें. रण हें उपमेय व अन्तःपुर हें उपमान असून श्लोकांतील वर्णन प्रत्यक्षपणे रणाला लागू पडतें; अन्तःपुरांतील आवडती व नावडती या केवळ अप्रत्यक्षपणे सुचवल्या जातात.

मम्मटाने हा श्लोक रूपकाचें उदाहरण म्हणून घेतला आहे. रणावर अन्तःपुराचा, मण्डलाग्रलते (खड्गा-) वर नायिकेचा व रिपुसेनेवर प्रतिनायिकेचा आरोप केलेला असून त्यांपैकी फक्त पहिला आरोप स्पष्ट आहे; इतर दोन्ही आरोप प्रत्यक्ष उच्चारलेले नाहीत. म्हणून एक भाग प्रत्यक्ष व इतर भाग अप्रत्यक्ष असलेलें हें एकदेशवि-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

र्वात रूपक आहे असें त्याचें म्हणणें आहे. पण रणावर अन्तःपुराचा आरोप आहे की रण व अन्तःपुर यांतील साधर्म्य वर्णिलेलें आहे हें ठरवण्यासाठी वर सांगितलेली वस्तुनिष्ठ कसोटी लावून पाहिल्यास निर्णय साधर्म्याच्या म्हणजे उपमेच्या बाजूने लागतो. अलंकारनिर्णय करण्यास लेखकाचें उद्दिष्ट, वाचकाच्या मनावर अधिक ठसणें अशा एखाद्या व्यक्तिनिष्ठ कसोटीपेक्षा वर दर्शविलेल्या कसोटीसारखी एखादी वस्तुनिष्ट कसोटी वापरणें अधिक शास्त्रीय नव्हे काय ? व तसें असेल तर प्रस्तुत श्लोकांत धर्मवादिलुप्ता उपमा आहे असेंच म्हणणें अधिक सयुक्तिक नव्हे का ?

विश्वनाथाच्या साहित्यदर्पण ग्रंथांत दिलेलें एकदेशविवर्ति रूपकाचें उदाहरण वर उल्लेखिलेल्या कसोटीस पूर्णतः उतरतें हें जातां जातां पाहण्यासारखें आहे. तें असें—

लावण्यमधुभिः पूर्णमास्यमस्या विकस्वरम् ।
लोकलोचनरोलम्बकदम्बैः कैर्न पीयते ॥

(लावण्यरूपी मधाने पूर्ण भरलेलें तिचें विकासशील मुख लोकनेत्ररूपी भुंग्यांच्या समूहापैकी कोणाकडून प्यालें जात नाही ?)

इथे मुखावर कमलाचा आरोप केलेला आहे हें सहज दिसतें. कारण 'विकस्वरम्' हें विशेषण कमळाला प्राथमिकतः लागू आहे, मुखाला नाही.

२. ध्वन्यालोक—आनन्दवर्धनाने लिहिलेल्या ध्वन्यालोकांत 'काव्यस्य आत्मा' हे शब्द पुष्कळ ठिकाणीं उपयोगांत आणलेले आहेत. पहिल्या उद्योतांतील पहिल्या कारिकेंत 'ध्वनी' (व्यङ्ग्य अर्था-)ला काव्याचा आत्मा मानणाऱ्या पूर्वाचार्यांचा उल्लेख केला आहे. त्या उल्लेखावरील वृत्तीवरून ग्रंथकर्त्याला हा सिद्धान्त मान्य आहे, इतकेंच नव्हे त्याचें समर्थन हाच त्याच्या ग्रंथलेखनामागील हेतु आहे हें उघड होतें.

पुढे दुसऱ्या कारिकेंत लेखक म्हणतो—

अर्थः सहृदयश्लाघ्यः काव्यात्मा यो व्यवस्थितः ।
वाच्यप्रतीयमानाख्यौ तस्य भेदावुभौ स्मृतौ ॥

(सहृदय रसिकांनी स्तुत्य मानलेला असा जो अर्थ काव्याचा आत्मा म्हणून निश्चित केलेला आहे त्याचे वाच्य व प्रतीयमान असे दोन भेद मानलेले आहेत.)

या कारिकेंत 'सहृदयश्लाघ्य अर्थ' याला काव्याचा आत्मा म्हटलेलें आहे. तेव्हा सहृदयश्लाघ्य अर्थ म्हणजेच ध्वनि असें समीकरण मान्य झालें पाहिजे. कारण दोन्हीहि काव्यात्मा आहेत; पण तें समीकरण बरोबर नाही हें स्पष्ट आहे. कारण सहृदयश्लाघ्य अर्थाचे वाच्य व प्रतीयमान असे दोन भेद ग्रंथकर्त्याने केले आहेत व 'ध्वनी'मध्ये केवळ प्रतीयमान अर्थाचें माहात्म्य अभिप्रेत आहे.

पुढे पांचव्या कारिकेंत प्रतीयमान अर्थाला उद्देशून 'काव्यस्य आत्मा' हे शब्द योजले आहेत. वाच्य व प्रतीयमान हे ज्याचे दोन भेद तो सहृदयश्लाघ्य अर्थ आणि केवळ प्रतीयमान अर्थ हे दोन्हीहि काव्यात्मा आहेत हें म्हणणें विसंगत नाही का ?

तेराव्या कारिकेंत ध्वनीचें लक्षण सांगतांना लेखक म्हणतो—

यत्रार्थः शब्दो वा तमर्थमुपसर्जनीकृतस्वार्थौ ।
व्यङ्क्तः काव्यविशेषः स ध्वनिरिति सूरिभिः कथितः ॥

(जिथे अर्थ किंवा शब्द स्वतः गौण स्थान पत्करून त्या म्हणजे व्यङ्ग्य किंवा प्रतीयमान अर्थाला व्यक्त करतात तो काव्याचा विशेष प्रकार म्हणजे ध्वनि होय, असें आचार्यांनी म्हटलें आहे.)

अर्थात् ज्या काव्यांत केवळ वाच्यार्थ प्रमुख असेल तें काव्य आहे, पण ध्वनि नाही. म्हणजे त्या काव्यांत काव्याचा आत्मा नाही, तें आत्मा नसलेलें काव्य होय ! पहिल्या कारिकेंत ज्याला काव्याचा आत्मा म्हटलें तो ध्वनि या कारिकेप्रमाणे काव्याचा एक सर्वोत्कृष्ट प्रकार झाला. यांत विसंगति नाही का ?

तात्पर्य, सहृदयश्लाघ्य अर्थ, प्रतीयमान अर्थ, व ध्वनि या वेगवेगळ्या अंगांना काव्यात्मा म्हटल्याने विसंगति निर्माण झाली आहे व अशी विसंगति कोणत्याही शास्त्रीय ग्रंथाचें मोठेंच वैगुण्य होय.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

डॉ. केदार यांचें चरित्र

प्रकाशक--बॅ. वि. तु. केदार, बार-ॲट-लॉ, काटोल रोड, सदर, नागपूर. मुद्रक-श्री. पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी. धन्तोली, नागपूर. पृष्ठसंख्या-४४+३३६+१२०. मूल्य ५ रु.



केदारचरित्राचे लेखक

नागपूरच्या 'महाराष्ट्र' दैनिकाचे उपसंपादक व 'खरे' चरित्रकार श्री. जगन्नाथ रामचंद्र जोशी यांनी मध्यप्रदेशांतील नामांकित कायदेपंडित व नागपूर विद्यापीठाचे कर्तबगार कुलगुरु कै. डॉ. नानासाहेब केदार यांच्या जीवन-कार्याची माहिती देणारा प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे. श्री. जोशी यांनी डॉ. खरे यांचें चरित्र दोन विस्तृत खंडांत यापूर्वीच लिहिलें असल्यामुळे दैनिकाच्या धबडग्यांत रमणारी त्यांची लेखणी चरित्रलेखनाच्या कार्यांतहि सरावलेली आहे असें म्हणावयास हरकत नाही. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचा सन्मान्य अपवाद सोडला तर पदवी किंवा पांडित्य यांपैकी कांहीहि पाठीशीं नसतांना, दैनिकाचा व्याप संभाळून, स्वतंत्र ग्रंथनिर्मिति करणारे मध्यप्रदेशांतील तरी श्री. जोशी हे एकमेव ग्रंथकार आहेत. आणि म्हणून, त्यांच्या साहित्यप्रेमाबद्दल व तें प्रत्यक्षांत उतरविणाऱ्या त्यांच्या साक्षेपी उद्यमशीलतेबद्दल मीं सुरवातीलाच त्यांचें अभिनंदन करतों.

मराठींतील चरित्रवाङ्मयाचें विहंगमावलोकन केलें तर एक गोष्ट चटकन् नजरेसमोर येते. ती अशी की मराठींतील, किंबहुना सर्वच देशी भाषांतील चरित्रग्रंथ हे **वर्णनात्मक** पद्धतीनें लिहिलेले असतात. चरित्रनायकाच्या वर्णनापेक्षा त्याच्या समाजवलयांच्या वर्णनालाच त्यांत प्राधान्य दिलेलें आढळतें. विशिष्ट कालखंडाचा तो सर्वांगीण चित्रपटच असतो. आणि त्या चित्रपटांत नायकाच्या व्यक्तिदर्शनापेक्षा घटनांच्या परंपरेलाच महत्त्वाचें स्थान मिळालेलें असतें. मग तें १८९४ सालीं प्रसिद्ध झालेलें विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें चरित्र असो, १९२३-२८ सालीं प्रकाशांत आलेलें केळकरांचें 'टिळक चरित्र' असो, १९२४ मध्ये प्रसिद्ध झालेलें प्रा. फाटक यांचें 'रानडे चरित्र असो, १९४७ सालीं प्रसिद्ध झालेलें प्रियोळकरांचें 'दादोबा चरित्र' असो किंवा १९५० मध्ये प्रकाशित झालेलें बाळशास्त्री जांभेकर यांचें 'जीवनवृत्त' असो. लिटन् स्ट्रॅची, आंद्रे मोर्वा किंवा एमल लड्विग यांनी पुरस्कारिलेल्या **कलात्मक** व **विश्लेषणात्मक** पद्धतीचा मराठी चरित्रवाङ्मयाला अद्यापि स्पर्शहि झालेला नाही असें म्हटलें पाहिजे.

श्री. जोशी यांच्या प्रस्तुत चरित्रग्रंथाचा स्पृहणीय विशेष जर कोणता असेल तर तो हा, की त्यांनी डॉक्टर केदार यांच्या जीवनकार्याचा हा वृत्तान्त अत्यंत साक्षेपाने व परिश्रमपूर्वक मिळविलेल्या अधिकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माहितीवरच आधारलेला आहे. या दृष्टीनें चरित्रलेखक हा संशोधकहि असतो. संशोधक हा ज्याप्रमाणे संशोधन-विषयाची माहिती अत्यंत साक्षेपाने गोळा करतो, त्याप्रमाणेच चरित्रलेखकानेहि चरित्रनायकांचीं पत्रें, दैनंदिन्या, आठवणी, टिपणें, त्याला इतरांनी लिहिलेलीं पत्रें, त्याचे इतरत्र आलेले उल्लेख, त्याच्या नातेवाईकांनी दिलेली माहिती, मित्रमंडळींच्या मुलाखती, अभिप्राय, त्याने इतरांना लिहिलेलीं पत्रें इ० सामग्री जुळवून, त्या सामग्रीची विश्वसनीयता पारखून तिची कलात्मक मांडणी करून त्यांतूनच चरित्रकाराने चरित्रनायकाच्या सर्वांगीण व्यक्तित्वाचा विकास घडवून आणावयाचा असतो. पर्णसंभारांतून बाहेर येणाऱ्या फुलाप्रमाणे, सामग्रीच्या ढिगाऱ्यांतून चरित्रनायकाच्या अस्मितेच्या मनोहर कमनीयतेचेंच दर्शन चरित्रलेखकाने वाचकांना घडविलें पाहिजे.

त्यांतूनहि कै. नानासाहेब केदारांसारख्या बहुरंगी व्यक्तित्व असलेल्या चरित्रनायकाची अधिकृत व सर्वस्पर्शी माहिती जुळविणें हें काम फारच जिकिरीचें व कष्टाचें. वर्धा नगरपालिका, मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळ, नागपूर प्रांतिक कॉंग्रेस कमिटी, नागपूर विद्यापीठ, फाशी निवारक समिति, अभिनव नाट्यमंदिर, महाराष्ट्र नाट्यसंमेलन इत्यादि संस्थांशीं नानासाहेबांचा निकट संबंध आल्यामुळे व 'खरे प्रकरणा'ची बाजू बाणीने लढविणारे धडाडीचे कार्यकर्ते, हैद्राबादच्या 'वंदेमातरम्' विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाचें दार खुलें करून देणारे कर्तबगार कुलगुरु, आष्टी-चिमूरच्या आरोपींना फांसावरून वाचविणारे निष्णात कायदेपंडित इत्यादि अनेक नात्यांनी नागपूर प्रांताच्या गेल्या तीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनावर नानासाहेबांनी आपल्या कर्तृत्वाची मोहर उमटविल्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाच्या पैलू न् पैलूवर प्रकाश पाडणारीं अस्सल साधनें व त्याबरोबरच वृत्तपत्रांच्या फायलींतून इतस्ततः विखुरलेली माहिती यांचें काळजीपूर्वक संशोधन आणि संकलन करणें अवश्य होतें. श्री. जोशी यांनी ही अवघड कामगिरी मोठ्या साक्षेपाने व यशस्वी रीतीनेहि पार पाडली आहे.

'चरित्रलेखक हा चरित्रनायकाचा अभिमानी चाहता नसेल, तर त्याच्या चरित्रलेखनांत जिव्हाळा आणि जोम हीं दोन्ही येत नाहीत' असें प्रस्तुत ग्रंथाच्या 'पुरस्कारां'त महाराष्ट्राचे ख्यातनाम टीकाकार श्री. माडखोलकर यांनी म्हटलें आहे. (पृ. २४) आधुनिक पाश्चात्य तंत्राला हें म्हणणें मान्य नाही. लिटन् स्ट्रॅची याचें तर म्हणणें असें आहे की चरित्र लिहिण्यापूर्वी चरित्रकाराने चरित्रनायकाविषयी कसल्याहि प्रकारचा पूर्वग्रह करून घेऊं नये. त्याच्यासंबंधी जितकी अधिकृत माहिती मिळविणें शक्य असेल, तितकी सर्व साक्षेपाने गोळा करून त्याने त्यांतून, पुतळा निर्माण करणाऱ्या कलावंताप्रमाणे, एकसंध अशी मूर्ति निर्माण केली पाहिजे. त्या माहितीचा अभ्यास करून, ती कलात्मकतेने संकलित केल्यावर जें चित्र तयार होईल तें खरें चित्र. किंबहुना, चरित्रकाराला चरित्रनायकाबद्दल सहानुभूति, जिव्हाळा किंवा आदर पाहिजेच हेंहि त्याला मान्य नव्हतें. त्यानें स्वत: व्हिक्टोरिया राणीचें जें चरित्र लिहिलें, तें त्याला राणीबद्दल प्रेम किंवा सहानुभूति होती म्हणून नव्हे, तर व्हिक्टोरियन युगांतील पोकळ, नीतिमत्तेच्या, फाजील, शिष्टपणाच्या व खोट्या मोठेपणाच्या कल्पनांचा दंभस्फोट करावा म्हणून!—

पण चरित्रनायकाबद्दल अभिमानी चाहत्याची किंवा गौरवाची जरी नव्हे तरी प्रेमाची, सहानुभूतीची किंवा सहानुभवाची तरी भावना असल्याशिवाय चरित्रकार त्याच्या व्यक्तित्वाशीं समरस कसा होऊं शकेल? आणि त्याच्या अंतःकरणांत शिरून त्याच्या मनाचें अंतरंग तरी त्याला कसें उलगडून दाखवितां येईल? किंबहुना, ज्या व्यक्तीची मनोवृत्ति, जिच्या आशाआकांक्षा अथवा जिच्या जीवनांतील आंतरिक किंवा बाह्य संघर्ष चरित्रलेखकाला आकर्षित करूं शकणार नाहीत तिच्या व्यक्तित्वाचें यथार्थ चित्रण तरी चरित्रलेखक कसा करू शकेल? 'The subject of a biography should be of a certain magnitude' या सिड्नेलीच्या उद्गारांतूनहि, चरित्रनायकाच्या जीवनांत सर्वसामान्य मनुष्यापेक्षा कांहीतरी वेगळेंपण, कांहीतरी वैशिष्ट्य हवें असेंच व्यक्त होत नाही काय?–या 'वेगळेपणानें'च

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चरित्रकार त्याच्याकडे आकर्षिल्या जातो. आंद्रे मोर्वाने शेले व डिझराएली यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. तीं लिहितांना चरित्रनायकाविषयीची त्याची भावना प्रेमाची, आदराची किंवा गौरवाची नव्हती; तर सहानुभूतीची आणि सहानुभवाची होती. शेले व डिझराएली यांच्या जीवनांत त्याला स्वतःच्या इच्छा-आकांक्षांचें प्रतिबिंब दिसलें व म्हणून तो त्यांच्याकडे आकर्षिल्या गेला. स्वातंत्र्यवीर सावरकर मॅझिनीच्या आत्मचरित्राकडे आकर्षिल्या गेले याचें प्रमुख कारण ही सहानुभवाचीच भावना नाही का ?—

श्री. जोशी यांची केदारांकडे पाहण्याची भूमिका व्यक्तिपूजेची दिसते. चरित्रकाराच्या ठिकाणीं चरित्रनायकाविषयी प्रेम असावें पण प्रेमान्धता नसावी, सहानुभूति असावी पण गौरव नसावा आणि आदर असावा पण चरित्रनायकाला देवमूर्ति बनविणारी आंधळी भक्ति नसावी. वेलींतील फुलणाऱ्या फुलासारखा चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचा विकास चरित्रकाराने दाखविला पाहिजे. त्याच्या अस्मितेचा स्वाभाविक विकास फुलवीत फुलवीत त्याने त्याच्या वैशिष्ट्यमंदिराच्या कळसाचें दर्शन वाचकांना घडविलें पाहिजे. चरित्रनायकाचें मोठेपण त्याच्या जन्मापासूनच गृहीत धरलें तर तें व्यक्तित्वाचें यथार्थ चित्रण होणार नाही, तो केवळ गौरवग्रंथ होईल.

प्रस्तुत ग्रंथाच्या सुरवातीलाच श्री. जोशी लिहितात—

'या ग्रंथांत ज्यांच्या **कर्तृत्वशाली जीवनाचा** वाचकांना परिचय करून द्यावयाचा ते कै. डॉ. तुकारामपंत केदार एका सामान्य कुळांत **याच** वर्धा नगरींत १९ जुलै १८८६ रोजीं जन्मास आले' (पृ. २)

श्री. जोशी पुढे म्हणतात—

'नेतृत्वाचा गुण त्यांच्या ठिकाणीं **उपजतच** होता.' (पृ. ३१) (जाड टाईप माझा)

केदारांचें जीवन कर्तृत्वशाली होतें किंवा नेतृत्वाचा गुण त्यांच्या ठिकाणीं उपजतच होता असें अगदी सुरवातीलाच सांगण्यांत कलेची फार मोठी हानी झाली आहे. चरित्रनायकाच्या कर्तृत्वाचा विकास हळूहळू कसा होत गेला हें दाखविण्यांत कलात्मकता आहे. सुरवातीलाच तें सांगून टाकण्यांत त्याच्या व्यक्तित्व-विकासाचें स्वारस्य काय राहिलें ?—आणि चरित्रनायकाचें जीवन कर्तृत्वशाली होतें असें स्वतःच्या शब्दांत तरी सांगण्याची चरित्रकाराला आवश्यकता तरी काय आहे ? चरित्र हा ललितवाङ्मयाचा एक प्रकार असल्यामुळे चरित्रकाराने चरित्रनायकाबद्दल स्वतःच्या मताचें प्रतिपादन कधी करूं नये. चरित्रनायकाच्या जीवनांत घडल्या असतील त्या गोष्टी त्याने कलात्मकतेने वाचकांपुढे मांडाव्या व त्यावरून चरित्रनायकाविषयी मत बनविण्याची जबाबदारीहि त्याने वाचकांवरच सोपवावी.

केदार जन्माला आले त्यावेळीं ते, तुकारामपंत नव्हते व डॉक्टर तर नव्हतेच नव्हते. त्यांच्या जन्माच्या वेळींच त्यांच्या नावामागे 'कै.' विशेषण लावण्यांत तर श्री. जोशी यांनी फार मोठा औचित्यभंग केला आहे. चरित्रनायक ही देवमूर्ति नव्हे. देवळांत दर्शनाला जातांना जसें उपायन घेऊन जावें लागतें, तसें चरित्र लिहितांना चरित्रनायकाविषयी मनांत भक्तीचें उपायन बाळगणें हें यथातथ्य व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने इष्ट नाही. चरित्रनायकाच्या ठिकाणीं मोठेपणाचे गुण उपजतच होते असें स्वतः लेखकाने सांगितलें म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाचा विकास दर्शविण्याची तरी मग काय आवश्यकता उरते ?

व्यक्तिपूजेच्या भावनेमुळेच श्री. जोशी यांनी लिहिलेलें प्रस्तुत चरित्र कमालीचें एकांगी झालेलें आहे. राष्ट्रीय पक्ष, प्रतिसहकार पक्ष, ब्राह्मणेतर पक्ष, लोकपक्ष, कांग्रेस इत्यादि पक्षांत केदारांनी केलेल्या प्रवेशामुळे त्यांच्यावर संधिसाधुपणाचा आरोप होत असे असें श्री. माडखोलकर यांनी 'पुरस्कारां'त सुचविलें आहे. श्री. जोशी यांनी या लोकापवादाचा आपल्या ग्रंथांत ओझरतादेखील उल्लेख येऊं दिला नाही. कदाचित् त्यामुळे आपल्या चरित्रग्रंथाला हीनपणा येईल किंवा आपल्या चरित्रनायकाविषयीच्या विभूतिपूजेंत उणेपणा दिसेल अशी त्यांना भीति वाटली असावी.

पण चरित्र म्हणजे विभूतिपूजन नव्हे, तें व्यक्तिविकासाचें यथार्थ चित्रण आहे. यादवकाळांत लिहिल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेलेलें 'लीळाचरित्र' व 'गोविंदप्रभूचरित्र' किंवा महीपतीची संतचरित्रेंच केवळ नव्हेत, तर मराठींत 'केदारचरित्रा'पर्यंत लिहिण्यांत आलेले बहुतेक सर्व चरित्रग्रंथ, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें 'डॉ. जॉन्सन चरित्र' किंवा श्री. माडखोलकर यांनी लिहिलेलें 'विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें चरित्र' असे एकदोन अपवाद सोडल्यास, विभूतिपूजेच्या रिंगणांतून अजून बाहेर पडलेले नाहीत असेंच म्हणावें लागतें.

सामान्य व्यक्तीचें असामान्य व्यक्तित्वांत कसें रूपांतर झालें याचें सत्यपूर्ण चित्रण करतांना त्या व्यक्तीचे दोष लपवून कसें चालेल ? आणि त्या चरित्र-ग्रंथांत मग जिवंतपणा तरी कसा राहील ? ज्याच्यांत अगदी नांवालाहि दोष नाही अशा व्यक्तीचें चरित्र-पण मग तें चरित्र राहणार नाही; स्तोत्र होईल तें !

असो. प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या रूपाने नागपूर प्रांताच्या गेल्या तीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा चित्रपट वाचकांच्या डोळ्यांपुढे उभा करण्यांत श्री० जोशी यांनी चांगलेंच यश मिळविलें आहे यांत शंका नाही. या ग्रंथाची सामग्री जुळविण्याकरिता त्यांनी जे अविश्रांत परिश्रम केले त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून व त्यांनी संकल्पिलेल्या एकनाथ चरित्राचें लेखन त्यांच्या हातून लवकर होवो अशी इच्छा व्यक्त करून हें परीक्षण संपवितो.

—सु. म. डो.

ललितकलेच्या सहवासांत

ले. श्री. पु. श्री. काळे

श्री. पु. श्री. काळे यांच्या 'ललितकलेच्या सहवासांत' या ग्रंथाने मराठी रंगभूमीच्या इतिहासांत अत्यंत मोलाची अशी भर घातली आहे.

मराठी रंगभूमीच्या इतिहासाच्या दृष्टीने, 'रंगभूमि' 'विविधज्ञानविस्तार' 'मनोरंजन' 'रत्नाकर' 'लोकसत्ता' इ० नियतकालिकांनी, कै. वा. शंकरराव मुजुमदार, कुळकर्णी, दंडवते, कै. टेंबे, नटवर्य बोडस, नटवर्य कोल्हटकर, पु. रा. लेले, काणेकर, व. शां. देसाई, खांडेकर, काणेकर, दादा लाडू, वरेरकर, आदि नाट्यरसिक व विद्वानांनी पुष्कळच कार्य केलें आहे. परंतु हे सर्व ग्रंथ वाचूनहि मराठी रंगभूमीच्या एका महत्त्वाच्या परंपरेचा तपशीलवार, निरपेक्ष व सहृदय असा इतिहास आजवर उपलब्ध नव्हता, ती उणीव श्री. काळे यांच्या ग्रंथानें भरून निघाली आहे.

मराठी रंगभूमीचा प्रतिष्ठित व वैभवशाली संगीत संसार प्रामुख्याने किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी व स्वदेश हितचिंतक नाटक मंडळी व या दोन संस्थांतून निर्माण झालेल्या गंधर्व, बलवंत, ललित कलादर्श इ० नाटक मंडळयांनीच सजविला होता. आजवर मराठी संगीत रंगभूमीची जी तपशीलवार माहिती उपलब्ध झाली आहे त्या माहितींत किर्लोस्कर नाटक मंडळी व गंधर्व नाटक मंडळी यांचाच वाटा अधिक आहे. याच संप्रदायांतील बलवंत संगीत नाटक मंडळीचा इतिहासहि कै. वा. दीनानाथ मंगेशकर यांची कन्या ख्यातनाम सिनेगायिका लता मंगेशकर यांनी प्रसिद्ध केलेल्या दीनानाथांच्या चरित्रग्रंथांत पुष्कळच मिळतो.

परंतु स्वदेशहितचिंतक व त्या कंपनींतूनच निघालेली ललितकलादर्श नाटक मंडळी यांचा तपशीलवार एकत्र असा इतिहास आजवरच्या ग्रंथांत आढळत नाही. रंगभूमीच्या शताब्दी महोत्सवांतील वाङ्मयकार्य समितीचा एक चिटणीस या नात्यानें स्वदेश हितचिंतक मंडळींतील एक प्रमुख घटक श्री. म्हसकर यांनी लिहिलेला इतिहास मी पाहिला आहे. परंतु तो अजून प्रसिद्ध व्हावयाचा आहे. स्वदेश हितचिंतक मंडळीचे जनुभाऊ निमकर यांना स्वर्गवासी होऊन कितीतरी वर्षें झालीं आहेत. परंतु नाट्यानुकूल व नाट्यपूर्ण प्रयोगाचें दिग्दर्शन याबाबत आजहि त्यांचें नांव अग्रेसर आहे. ललितकलादर्शचे संस्थापक केशवराव भोसले यांचें नाट्यशिक्षण जनुभाऊंच्या हाताखालीच झालें. केशवराव भोसले यांना जाऊन आज २५ वर्षें झालीं आहेत. तरी रंगभूमीवरील त्यांचा पराक्रम आजहि सर्व नाट्यरसिकांच्या अभिमानाचा विषय आहे. परंतु अजून केशवरावांचें चरित्र प्रसिद्ध झालें नाही. किंवा त्यांच्या नाटक मंडळीचा, त्यांनी नाट्य-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विश्रांत केलेल्या कार्याचा संगतवार व तपशीलवार इतिहास आजपर्यंत प्रसिद्ध नव्हता. ठिकठिकाणी प्रसिद्ध झालेली त्रोटक अशी माहितीच आजवर उपलब्ध होती.

मराठी रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने कै. केशवराव भोसले व त्यानंतर कै. पेंढारकर व श्री. चाफेकर यांनी केलेलें कार्य इतर नाटयसंस्थेपेक्षा किती तरी पुरोगामी आणि कलापूर्ण आहे. १९२० सालापासून हळूहळू मराठी नाटयप्रदेशावर उदयाला आलेल्या आधुनिक नाटयाच्या प्रवर्तनासाठी, प्रसारासाठी ललितकलेच्या चालकांनी, त्यासाठी लागणाऱ्या अमाप खर्चाची तमा न बाळगता, किती तरी धाडसी व पुरोगामी प्रयोग केले आहेत. अशा नाटयसंस्थेचा इतिहास मराठी नाटयरसिकांना उपलब्ध असू नये ही दुर्देवाची गोष्ट होती. श्री. पु. श्री. काळे यांच्या 'ललितकलेच्या सहवासांत' या पुस्तकाने ही फार मोठी उणीव बहुतांशाने भरून निघाली आहे.

बहुतांशाने म्हणण्याचें कारण केशवराव भोसले यांच्याबाबत आलेली माहिती अधिक तपशीलवार आली असती, त्यांच्या नाटयगुणाचा, महत्त्वाकांक्षी जीवनाचा क्रमाक्रमाने कसा विकास होत गेला याची आणखी अधिक माहिती मिळाली असती तर बरें झालें असतें. असें हें पुस्तक वाचून झालेल्या समाधानांतहि असमाधान वाटू लागतें. परंतु यांत ग्रंथकाराचा कांही दोष नाही हें येथे स्पष्ट करावेसें वाटतें. चवदार पक्वान्न समोर आलें असता बुभुक्षिताला तें अधिक मिळावें अशी साहजिकच हाव सुटते तशांतलाच या समाधानांतील असमाधानाचा प्रकार आहे.

श्री. काळे यांचें पुस्तक वाचल्यानंतर आपल्या मनावर या ग्रंथांत आढळणाऱ्या सोज्वलतेचा, निरपेक्षतेचा, निरहंकाराचा व सहृदयतेचा प्रत्यय प्रकर्षाने घडतो. ललितकलादर्श नाटक मंडळीने रंगमंचाच्या विकासासाठी पुरोगामित्वाचे जे जे प्रयोग केले त्यांत श्री. काळे यांचा अभिमानाने फुलून जाता येईल एवढा मोठा वाटा आहे. राक्षसी महत्त्वाकांक्षा या नाटकांतील देखाव्यांची भव्य सजावट महाराष्ट्रांतील ख्यातनाम कलावंत आनंदराव मेस्त्री यांनी करून रंगमंचाच्या अपूर्व सजावटीचा भरदार पायंडा घातल्यावर, 'शहा शिवाजी' नाटकापासून श्री. काळे यांनी ललितकलेच्या रंगमंचाला कलापूर्णतेने सजविलें. कलादृष्टि असणाऱ्या रसिकाला आनंदाने मान डोलावयास लावतील असे मोठे सेटस् व देखावे त्यांनी 'सत्तेचे गुलाम' व 'तुरुंगाच्या दारांत' या नाटकांसाठी तयार केले व 'सज्जन' नाटकांतील देखाव्यांनी काळयांची अपूर्व कला कळसाला पोहोंचली. या नाटकांतील नयनमनोहर, नवीन घर्तीच्या देखाव्यांची योजना, कल्पकता, व कलाकुसर श्री. काळे यांची स्वतःची असून या सर्व गोष्टींचें अलौकिकत्व आज निरपवादपणें सर्वमान्य असें आहे. या भांडवलावर इतरांप्रमाणे अहंकाराची, अहंमन्यतेची पूर्वग्रह भ्रष्ट मनोवृत्ति श्री. काळे यांना सहज धारण करता आली असती. गणपतराव बोडस यांची 'माझी भूमिका' किंवा श्री. पु. रा. लेले यांचे कांही लेख वाचावेत म्हणजे अहंमन्यता आणि बेफाट अहंकार लेखकाच्या व्यक्तिमत्वांत काठोकाठ भरला असला म्हणजे अकारण वावदूकता, परनिंदा व आत्मपूजा लेखनांत किती अनिष्ट प्रकारें व्यक्त होऊं शकते याचा अनुभव येतो. पण श्री. काळे नाटयप्रदेशांत वावरलेले असले तरी त्यांनी आपला साक्षेपी विवेक फार उच्च प्रकारें कायम ठेवला ही अभिमानाची गोष्ट आहे. ती अभिमानास्पद साक्षेपता, सत्याची चाड, व इतिहासकारांवर इतिहास लिहितांना पडणारी जबाबदारी त्यांनी क्षणभरहि नजरेआड केली नाही.'

बोडस, टेंबे यानी रंगभूमीचा इतिहास लिहितांना जें जें लिहिलें त्यांत चटकदार, एकमेकांवर कोपरखळया ओढण्यासारखे प्रकार अधिक होते. [श्री. बोडस यांचें 'माझी भूमिका' व श्री. टेंबे यांचें 'रंगचर्चा' (अजून अप्रसिद्ध)] अशा लेखनाने चटावलेल्या जिव्हा श्री. काळे यांच्या या सरळ, सहृदय लेखनानें समाधान पावू शकत नाहीत. अशा वाचकांच्या आहारीं श्री. काळे गेले नाहीत हा त्यांच्या या ग्रंथाचा इतिहास लेखनाच्या दृष्टीने दुसरा गुणविशेष आम्ही समजतों. त्यांच्या लेखनांत अवास्तव व्यक्तिपूजा नाही, भाविकांप्रमाणे वेडगळ कपोलकल्पित कथा नाहीत. हकीकतीच्या विवरणांत काल्पनिक मीठमसाला नाही. जें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे, तें सरळ, सत्याधिष्ठित वस्तुस्थिति निवेदन. संयमाच्या बंधनांनी त्यांनी स्वतःला इतकें जखडून बांधून घेतलेलें दिसतें की कांहीं ठिकाणीं कांही महत्त्वाच्या निवेदनाबाबत त्यांनी बुद्धिपुरःस्सर मूकता धारण केलेली आहे.

श्री. काळे यांचा हा ग्रंथ वाचत असतां महाराष्ट्रांत अग्रेसर असणाऱ्या नाटक मंडळयांच्या हितसंबंधाशीं, ती ती नाटक मंडळी व सार्वभौम पदावर अधिष्ठित झालेले त्या त्या नाटक मंडळीचे नाटककार, यांचा फार घनिष्ट संबंध आहे या ऐतिहासिक सत्याची जाणीव होते. रंगभूमीच्या इतिहासांतील या, एका नवीन दालनाचें त्यांनी कलापूर्ण सूचकतेनें दर्शन घडविलें आहे. नानबा गोखले आणि केशवराव शितूत यांची नाटककार पळविण्याची परस्परांत चाललेली चुरस व श्री. शितुत यांनी त्यांत मिळविलेलें यश याची मजेदार आठवण या ग्रंथांत दिली आहे. कांही नाटककार कांही नाटक कंपन्यांच्या जीवन मरणाचे वाटेकरी आहेत. मराठी रंगभूमीच्या इतिहासांत तिच्या जीवनाशीं पूर्णत्वाने एकजीव झालेल्या नाटककारांचाहि फार मोठा इतिहास असावा असें श्री. काळे यांचा हा ग्रंथ वाचून वाटूं लागतें.

अशा कांही नाजूक प्रसंगांच्या निवेदनांत श्री. काळे आपल्या वाचकाला त्या प्रदेशाशेजारी नेतात—वाचकांची उत्कंठा वाढवतात व लगेच पडद्यावरील चित्रित प्रसंग अत्यंत चित्तवेधक अवस्थेंत असता एकाएकी फिल्म तुटून एकदम सिनेगृहांत सर्वत्र अंधार व्हावा, अशा प्रकारें वाचकांची उत्कंठा तेथेच तोडून टाकतात. त्यांत त्यांचा हेतु अत्यंत सोज्वल असतो हें उघड आहे. आपल्या निवेदनाला परनिंदेचा कलंक लागू नये हाच त्यांत त्यांचा हेतु असतो. असल्या प्रसंगाचें उदाहरण द्यावयाचें झाल्यास पृष्ट ८१ वरील हकीकतीचें देता येईल—'पण अशा गोष्टी होत्या तर?' या त्यांच्या एका वाक्यांत केवढा मोठा अर्थ खच्चून भरला आहे असें वाटूं लागतें.

पुष्कळ विचार करूनहि मराठी रंगभूमीचा इतिहास निवेदन करतांना श्री. काळे यांनी सद्हेतूने का होईना परंतु त्यांना ज्ञान असणारें सत्य कांहींसें लपवून ठेवलें असा परिणाम वाचकाच्या मनावर झाल्याशिवाय राहत नाही. इतिहासनिवेदन परनिंदापर नसावें ही अत्यावश्यक गोष्ट आहे. परंतु त्यासाठी सत्यापलाप करणें केव्हांहि समर्थनीय ठरणार नाही. किंबहुना माहितगारांनी अशा गोष्टी (सत्य असल्या तर) निर्भयतेने उजेडांत आणल्याच पाहिजेत.

श्री. काळे यांची सहृदयता पदोंपदीं त्यांच्या ग्रंथलेखनांत आढळते. केशवराव स्वर्गवासी झाले त्यावेळचें त्यांचें निवेदन किंवा पेंढारकरांच्या शेवटच्या दिवसांचें वर्णन हीं कोणाच्याहि हृदयाला पाझर फोडण्यासारखीं आहेत.

या सुंदर ग्रंथाला तितकेंच सुंदर श्री. के. बा. भोळे यांनी लिहिलेलें 'कांही संगीत. स्मृति' हें प्रकरण जोडलें आहे. कै. केशवराव भोसले यांचें मृत्युपत्र आणि श्री. वरेरकरांनी या सत्य घटनेचा आपल्या 'सत्तेचे गुलाम' नाटकांत केलेला नाटयपूर्ण वापर, 'रेवा' प्रकरण आदि प्रकरणे माहितीच्या दृष्टीने वाचकांना नाविन्यपूर्ण वाटतात. बापूसाहेब पेंढारकरांसारखा महत्वाकांक्षी मोहरा व्यसनाच्या सदरांत पडणाऱ्या गुणातिरेकाने कसा वाया गेला याची त्यांनी केलेली कारणमीमांसा सहृदय तितकीच विचारपूर्ण व मार्मिक आहे. श्री. काळे यांच्या संग्रही मराठी रंगभूमिसंबंधी बरीच माहिती असावी असें दिसतें. श्री. व. शां. देसाई यांच्या 'मखमलीच्या पडद्यासाठी' त्यांनी बरीच माहिती पुरवली होती. खऱ्या खोटयाचा विवेक राखण्याची श्री. काळे यांची मनोवृत्ति आहे. अशा जाणत्या पुरुषाने आपल्या संग्रहीच्या संपूर्ण नवीन माहितीचें दुसरें एखादें पुस्तक प्रसिद्ध केल्यास महाराष्ट्रांतील नाटयरसिक त्याहि ग्रंथाचें अगत्यानें स्वागत करतील असें निःसंशय वाटतें. 'ललितकलेच्या सहवासांत' या ग्रंथाचें प्रकाशन करतांना लेखकप्रकाशकांना आर्थिक अडचण जाणवली ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

श्री. काळे यांच्या या माहितीपूर्ण ग्रंथाचा पुरस्कार करतांना कोणाला आनंद वाटणार नाही ?

द. रा. गो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुर्गादर्शन आणि कांही कविता

कवि : ना. रा. शेंडे. प्रकाशक : दि. मा. घुमाळ, नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर १. पृ. ९२. मूल्य २ रुपये.

श्री. ना. रा. शेंडे यांनी गेल्या दोन तपांत जी कांही काव्यतपस्या केली आहे त्याचें फल म्हणजे प्रस्तुत काव्यसंग्रह होय. श्री. शेंडे हे मराठी वाचकांना एक चतुरस्र साहित्यिक म्हणून परिचित आहेत. त्याचप्रमाणे एक निरलस सामाजिक कार्यकर्ते म्हणूनहि त्यांची प्रसिद्धि आहे. अर्थात लोकसेवा हा त्यांच्या निरलस स्वभावाचा जो स्थायिभाव, तो त्यांच्या या काव्यांतूनहि प्रगट होतो यांत आश्चर्य नाही. संग्रहांतील अनेक कविता रचनाकालाच्या दृष्टीने जुन्या असल्या तरी त्यांतून व्यक्त होणारे सामाजिक विषमतेचें चित्रण अद्यापिहि नवें वाटतें. अन्न, वस्त्र आणि एक निवारा या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी सामान्य मानवाला सारा जन्म संघर्ष करावा लागतो हें पाहून कवीचें मन खिन्न होतें. आतापर्यंत हें असें होत आलें, निदान स्वतंत्र भारतांत तरी हें असें चित्र दिसूं नये म्हणून कवि तळमळून विचारतो,

भारताचे वारसदार खरे तडफडूं लागले
महाल बंगलींतले हंसूं खदखदां लागले
वर्गभेदाची भिंत कोसळेल का आता
स्वतंत्र भारताच्या पृष्ठभागावरील
नष्ट होईल का दुःख माते, की—
सारा जन्म संघर्ष संघर्ष ! (पृ. ८१)

आजच्या या समाजरचनेंत जणूं या सामान्य माणसाला कांही मूल्यच उरलेलें दिसत नाही. मूठभर उच्चभ्रू लोकांकडून तिरस्कृत झालेल्या या हजारो दलित लोकांच्या दुःखाविषयींची तीव्र सहानुभूति या संग्रहांतील अनेक कवितांतून प्रगट होत आहे. मानवसमाजाच्या आजच्या मानसिक व सांस्कृतिक अधःपाताची कांहीशी कल्पना संग्रहांतील ' कधी ऐकिलें जें न ! ' ' गलित पाकळी ' ' विषमज्वर ' आदि कवितांद्वारें येऊं शकेल.

' दुर्गादर्शन ' हें काव्य त्यांतील तात्त्विक विचारांच्या गुंफणीमुळे अत्यंत परिणामकारक झालें आहे. मात्र काव्याचें अधिष्ठान तात्त्विक असलें तरीहि त्याची अभिव्यक्ति रुक्ष झालेली नाही. किंबहुना इतर काव्यांपेक्षा तेंच अधिक उत्कट व म्हणूनच प्रभावी झालें आहे. ब्राह्मण्य, पाप–पुण्य, माणूस इत्यादींच्या श्री. शेंडे यांनी केलेल्या व्याख्या पाहिल्या म्हणजे त्यांची विचारकक्षा किती विस्तृत आहे याचा प्रत्यय येतो. प्रस्तुत दीर्घकाव्यांत तथाकथित प्रतिष्ठावंत भाविकांवर त्यांनी जी सूचक टीका केली आहे तीहि पाहण्याजोगी आहे.

मात्र यांतील बऱ्याच कविता वाचतांना चोखंदळ वाचकांना छंददोषाच्या अनेक ठेंचा लागतील. कुठेकुठे गद्यप्राय, खडबडीत रचनेचाहि आढळ होतो ! पण हा बाह्यांगदोष झाला. तिकडे उदारमनस्क रसिक विशेष लक्ष (कदाचित) देणारहि नाही ! पण—

' गुलाबाच्या फुलावर विहरतो मानसमोर ' (पृ. ५५) अशा प्रकारचें परंपरागत व निसर्गसिद्ध अशा काव्यसंकेताशीं विसंगत असें वर्णन कवीनें केल्यास तो प्रमाद त्या रसिकाला अक्षम्य वाटेल एवढें मात्र कवीला स्नेहानें सुचवावेसें वाटतें !

कवीने एका कवितेंत टीकाकाराला 'शब्दसैतान' (पृ. ७१) असें संबोधलें आहे. प्रस्तुत परीक्षण लिहितांना मात्र कवीला अभिप्रेत असलेली ' वस्तुनिष्ठ–कलानिष्ठ ' अशीच भूमिका मी स्वीकारली आहे हें मुद्दाम नमूद करणें मला महत्त्वाचें वाटतें.

पानोळ्या

कवि भाऊ मांडवकर. प्रकाशक—सेवा प्रकाशन, झेंडा चौक महाल, नागपूर. मूल्य २॥ रु. पृ. ७२.

' 'दलित' जीवना गाणें गाण्या'च्या तळमळींतून जसें श्री. शेंडे यांचें काव्य निर्माण झालें आहे, त्याचप्रमाणे

' नेसुनि धोतर गुडघ्यावरती
खांदी कांबळ, काठी हातीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काळिसावळी किसानमूर्ति' (पृ. ३) शेतांत रात्रंदिन खपतांना पाहून श्री. मांडवकर यांच्या प्रतिभेला फुलोर आलेला आहे. संग्रहांतील बहुतेक कविता शेतकरी जीवनावर आधारलेल्या असल्याने 'चालू' मराठी काव्याच्या वाचकाला हा संग्रह कांहीसा वेगळा वाटेल. आणि हें वेगळेंपण हेंच या काव्याचें वैशिष्ट्य होय. पांढरपेशा समाजाचें वर्णन करून कंटाळलेल्या कांही कवींनी थारेपालट म्हणून मध्यंतरीं 'खेडवळ' जीवानचें चित्रण करून पाहिलें होतें. पण तें बहुधा वास्तवापासून बरेंच दूर व स्वप्नरंजनात्मक असेंच होतें. कै. कविवर्य तांब्यांचें 'गुराख्याचें गाणें' हें या स्वप्नरंजनात्मक ग्रामगीताचें सुरेख उदाहरण आहे. श्री. भाऊ मांडवकर मात्र या स्वप्नरंजनांत गुरफटले नाहीत. गुरफटूं शकले नाहीत; कारण ग्रामजीवनाची यथार्थ कल्पना त्यांना प्रत्यक्ष अनुभवाने आलेली आहे. ग्रामजीवन हें स्वर्गापेक्षाहि मनोरम असल्याचा दावा मांडणाऱ्या तथाकथित जानपद गीतकाराना उद्देशून श्री. मांडवकरांचा कृषक—

'राजे' म्हणून कोणी संबोधतात आम्हां
या पाहण्यास येथे या चंद्रमौळि धामा
बोलांचिया कढीने संपेल भूक कैशी ?
वा कागदी ह्यांनी होई खुशी कुणाशी ? (पृ. २२)

असा रोकडा सवाल करतो व पुढे स्वतःचा अभिप्राय व्यक्त करतो—

'कर्दा जगांत श्रेष्ट धंदाहि श्रेष्ठ त्याचा !'
ही बोलघेवड्यांची बोले सदाच वाचा.'

रात्रंदिवस घाम गाळून हाडाचीं काडें करणारा कास्तकार मात्र उपाशी रहावा व कांही श्रम न करणारे ऐतखाऊ मात्र आरामाने गाद्यागिर्द्यांवर लोळत पडावेत ही सामाजिक विषमता श्री. मांडवकरांच्या अनेक कवितातून प्रगट झाली आहे. या दृष्टीने 'तेथे आणि येथे' ही कविता विशेष महत्त्वाची वाटते. प्रस्तुत कवितेंतील—

'तेथे मोत्याला धुवाया
तेल साबण विपुल
येथे लटा न्हायला
सापडेना एरंडेल' (पृ. ५) या ओळी कोणा

सहृदयाला विषण्ण करणार नाहीत.

वस्तुतः शेतकऱ्यांचें जीवन हें अकृत्रिम असें आहे. देहप्रीतीच्या अभावामुळे म्हणा किंवा तेवढी फुरसत नसल्यामुळे म्हणा, चैन करण्याची त्यांना कांहीच आवश्यकता वाटत नाही.

आम्हां गरीबांना
तलाव दर्पण
रूप पाहूं पूर्ण ! (पृ. १०) अशी त्यांची

परिमित समाधानी वृत्ति ! पण यंत्रयुगाचा वारा लागल्यामुळे त्यांच्या ह्या अकृत्रिमतेलाहि आता तडा पोहोचला आहे. 'च्या'ची तल्लप करते बाई' या चित्रसदृश कवितेंत कवि विषादाने उद्गारतात—

परंपरेची कांदा आंबिल
झाली त्यांची हकालपट्टी
यंत्रयुगाचा आला 'च्या' हा
घराघरांतुन खेडोपाडीं (पृ. ३७)

वर उल्लेखिलेल्या कवितांशिवाय 'माझा सुखाचा संसार' (पृ. ४९), 'प्रेमकहाणी' (पृ. ५६), 'वेळूवाच्या रांजीतला' (पृ. ५४), 'पावसांत' (पृ. ६२), 'गर्द सावली पंख पसरते' (पृ. ६४), 'काजळलेले पंख' (पृ. ६५), 'शिवारांतली शांती—' (पृ ६८) इत्यादि कविताहि सुंदर आहेत. 'साजुनी', 'तळीचें गाणें', 'पांत' आदि कविता शेतकरी–जीवनांतील कांही प्रसंग वर्णन करणाऱ्या असून तें तें दृश्य प्रत्यक्ष दृष्टीसमोर उभें करतात. अनेक कवितांतून शिष्ट मराठींत अद्यापि न रुळलेल्या अशा कित्येक सुंदर शब्दांची पखरण झालेली आहे तीहि वातावरणनिर्मितीच्या दृष्टीने आवश्यक वाटते !

एकंदरींत श्री. मांडवकरांनी मराठी ललित साहित्याच्या प्रांगणांत टाकलेलें हें पहिलेंच पाऊल मोठें डौलदार आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

वाकळ

कवि यशवंत. प्रकाशक : य. दि. पेंढरकर, १९६/३४ सदाशिव पेठ. पुणें २. पृ. १६४, मूल्य ३ रुपये.

अनुक्रमणिका

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सप्टेंबर १९६६

'वाकळ' हा कवि 'यशवंता'च्या १९४६ नंतरच्या निवडक स्फुट कवितांचा संग्रह. यशवंतांची कविता म्हटली म्हणजे एक विशेष कल्पना आपल्या मनांत निर्माण होते. प्रस्तुत काव्यसंग्रहहि याला अपवाद नाही. मात्र या संग्रहांत व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या कवितांचा विशेष आढळ न होतां कांहीशी तत्वचिंतनपरता व उपदेश त्यांमधून प्रत्ययास येतो. विषयांची विविधता हा त्यांच्या सर्वच संग्रहांचा विशेष याहि संग्रहांत सापडतो. यशवंतांची दृष्टि एक प्रकारच्या स्थिरनैराश्याची आहे असें अनेक टीकाकारांचें म्हणणें आहे. मात्र या संग्रहांत कवि आशावादी झाल्याचें दिसून येतें. या उतारवयांतहि

'विचारांच्या भ्रमणाला नाही अजून अटक
सोसायाला त्याच्या कळा आहे अजून धवक'
(–मुगारे, पृ १३१)

असें त्यांना म्हणावेसें वाटतें.

आपल्या मनोवेलीस 'नित्य नवीन मुगारे' फुटत असल्यांची त्यांना जाणीव आहे. हे मुगारे केव्हा काव्यरूपाने बहरून येतात याची उत्कंठा रसिक वाचकाला वाटावी एवढें सौंदर्य ह्या संग्रहांत खचितच आहे.

व. कृ. व.

सावली

नागपूरकरांना सुपरिचित असे श्री. ना. रा. शेंडे यांच्या १५ कथांचा हा संग्रह आहे. याला सुप्रसिद्ध कादंबरीकार व टीकाकार श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची प्रस्तावना, श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचा आशीर्वाद व श्री. पु. य. देशपांडे प्रभृति साहित्यिक सुहृदांचा पुरस्कार लाभलेला आहे. वास्तविक या सर्वांच्या 'सावली' शिवायहि 'सावली' उठावदार दिसूं शकेल अशीं कांही वैशिष्टयें या संग्रहांतील कथांत आहेत.

पहिलें वैशिष्टच हें की यांतील बहुतेक कथा लेखकाच्या प्रत्यक्ष अनुभवांतून निर्माण झाल्या आहेत. त्यांतील कित्येक तर सत्यकथा असल्याचा भास होतो. त्यामुळें साहजिकच त्यांच्यांत परिणामकारकता आलेली आहे.

लेखक ग्रामीण व शहरी अशा दोन्ही जीवनांत वावरलेला असला व दोन्ही जीवनाशीं संबंधित अशी कथा प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट असल्या तरी त्याचा ओढा ग्रामीण जीवनाकडे विशेष आहे असें वाटतें. व म्हणूनच ग्रामीण प्रदेशाचें व जीवनाचें चित्र अधिक उठावदारपणें चित्रित झालें आहे. नागपूर–वऱ्हाड कडील ग्रामीण जीवनाचें चित्र रेखाटणाऱ्या कथा असें या कथांचें दुसरें वैशिष्टच सांगतां येईल.

मध्यमवर्ग व कनिष्ठ, काबाडकष्ट करणारा असा वर्ग या दोहोंचीहि चित्रें यांत आलीं असलीं तरी काबाडकष्ट करणाऱ्या खेडुतांशीं लेखक अधिक समरस झालेला दिसतो. व यांतच या कथांचं तिसरं वैशिष्टच सांपडण्यासारखं आहे.

ग्रामीण जीवनाप्रमाणेच ग्रामीण अशिक्षितांची भाषाहि लेखकाला चांगली परिचित व अवगत आहे. व अनेक खेडुतांचे त्यांच्या भाषेंतील संवाद स्वाभाविक व उठावदार वाटतात.

प्रस्तुत कथा वाचतांना लेखकाचा ओढा करुणाकडे अधिक असल्याचा भास होतो. त्यामुळेच बहुधा कथांत (उदा: सावली, राणी, बैलजोडी, बकुल इ०) दुर्दैवाचा घाला अकस्मात व अभावितपणें पडलेला दिसतो. क्वचित् तो अकारणहि वाटण्यासारखा आहे. याचें मूळ बहुधा प्रस्तावनाकार व पुरस्कारकर्ते यांनी सुचविल्याप्रमाणें लेखकाला आलेल्या दारुण अनुभवांत असेल.

व्यक्तिदर्शनापेक्षाहि करुण, भीषण, उदात्त अशा प्रसंगांच्या व घटनांच्या चित्रणावरच लेखकाचा भर दिसतो. त्यामुळेच सूक्ष्म मनोविश्लेषण या कथांतून आढळत नाही. पण अशा करुण, भीषण प्रसंगांनीच अनेक कथा चटका लावणाऱ्या व क्वचित् अद्भुततेमुळे आकर्षून घेणाऱ्या अशा झाल्या आहेत. उदा. राणी, सावली, जाणीव, बैलजोडी, कजलीचें धन इ.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बारकाईनें शोधल्यास आणखीहि कांही वैशिष्टयें व वैगुण्यें या कथांतून दिसतील, नाही असें नाही. तथापि एकूण एक वैशिष्टय व वैगुण्य शोधणें हा प्रस्तुत अभिप्रायाचा व अभिप्राय लेखकाचाहि उद्देश नाही. शेवटी, प्रतिकूल परिस्थितींतहि साहित्याविषयीं आवड, आस्था व साहित्यनिर्मितीची क्षमता श्री. शेंडे यांनी जोपासली व आलेल्या अनुभवांच्या कटुतेचें साहित्याच्या मधुरतेंत रूपांतर केलें, अनुभवाच्या दारुण 'तपां'तून 'सावली'ची निर्मिति केली याबद्दल कोणीहि साहित्यप्रेमी त्यांचें अभिनंदन करील व त्यांना धन्यवाद देईल.

--श्री. मा. कु.

उन्मीलन

लेखिका—श्रीमती आनंदीबाई जयवंत, बडोदे. प्रकाशक—ठाकूर आणि कंपनी लि., अमरावती. किं. ३ रु.

बडोद्याच्या सुप्रसिद्ध मराठी लेखिका श्रीमती आनंदीबाई जयवंत यांनी लिहिलेली ही एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी आहे. याच लेखिकेच्या सुमारें एक तपापूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'उर्मिला' ह्या कादंबरीप्रमाणेच 'उन्मीलन' ह्या कादंबरीचा विषयसुद्धा स्त्रीजीवनाशीं निगडीत आहे. लेखिकेच्याच शब्दांत सांगावयाचें झाल्यास, "नायिकेला परिस्थितीच्या कैचींत सांपडल्यामुळे आडमार्ग पत्करावा लागून तिचें जीवन निर्माल्यवत् होण्याचा प्रसंग येतो; परंतु वेळींच तिचें जीवन सुसह्य होतें. या घटनेवर ही कादंबरी आधारलेली आहे."

'परिस्थितीच्या कैचींत सांपडलेली' ही नायिका म्हणजे विदुला. कॉलेजांत शिकत असतांना ती पराग मोहिले ह्या नांवाच्या एका कॉलेज-विद्यार्थ्याच्या प्रेमांत पडते. पराग मोहिले हा उमदा, हुशार व देखणा तरुण असून एक सरदारपुत्र आहे. विदुला ही आपल्या भावाच्या-दादाच्या आश्रयाने शिकत असते. दादावर पुढे ऑफिसांतील रकमेची अफरातफर केल्याचा आरोप येतो. तत्पूर्वी विदुलेने चंद्रशेखर ह्या नांवाच्या एका ख्यातनाम पण अविवाहित वकीलाच्या भाचीची-लिलीची-शिकवणी घेतलेली असते. विदुलेशीं लग्न करावें हा विचार चंद्रशेखरच्या मनांत येतो त्याचवेळीं तिच्या भावाकडून चंद्रशेखरकडे कर्जाऊ रकमेची मागणी होते. चंद्रशेखरचा खाजगी कारकून बापूराव ह्याच्या सांगण्यावरून गैरसमज होऊन भावाच्या अब्रूरक्षणार्थ चंद्रशेखरशी विवाह करणें अपरिहार्य वाटल्यामुळे आणि त्याच वेळीं परागच्या प्रेमांतील प्रामाणिकतेविषयी मनांत संशय निर्माण झाल्यामुळे विदुला चंद्रशेखरशी विवाहबद्ध होण्यास आपली संमति दर्शविते. तिचें विवाहपूर्व जीवनांतील प्रेमप्रकरण चंद्रशेखरच्या लक्षांत येऊन तो उदारबुद्धीने तिला वाटेल त्या वेळीं घटस्फोट देण्याची आपली तयारी असल्याचें तिला सांगतो. परंतु विदुला घटस्फोट न घेतांच परागबरोबर पळून जाते. परागने विदुलेचा नाद सोडावा ह्या त्याच्या वडिलांच्या इच्छेपुढे हा 'प्रेमवीर' मान तुकवितो. थोर अंतःकरणाचा चंद्रशेखर अखेर पुन्हा विदुलेच्या सहाय्यास धावून येतो आणि तिचा पत्नी म्हणून पुन्हा स्वीकार करतो. असा ह्या कादंबरीचा एकूण विषय. ह्या विषयाला लेखिकेनें 'धाडशी' विषय कां म्हटले तें कळत नाही. हा विषय मराठी कादंबरींतून ह्यापूर्वी हाताळला गेला नाही असें लेखिकेला सुचवावयाचें असल्यास नकळे.

विषयाची मांडणी अगदी सरळ आहे. म्हणजे कौशल्यपूर्ण नाही. रचनाकौशल्यांतील ही शून्यता भाषेच्या विशिष्ट प्रकारच्या संस्काराने भरून काढतां आली असती. पण तो संस्कारसुद्धा कादंबरींत कुठे आढळत नाही. त्यामुळे विषयाच्या पोक्तपणाशीं विसंगत वाटणारी रचनेची बाळबोधता रसिक वाचकांच्या मनाला जाणवल्याखेरीज राहत नाही. कादंबरीचा मुख्य विषय किंवा हेतु स्त्रीजीवनाशी निगडीत असला तरी कादंबरी वाचतांना चंद्रशेखर ह्या पुरुषपात्राच्याच व्यक्तिमत्वाचा ठसा अधिक खोलवर उमटतो. त्या व्यक्तिमत्वाच्या असामान्यतेने प्रभावित झालेल्या वाचकाला नायिकेचा-विदुलेचा-कित्येक प्रसंगींचा त्रागा अनाठायी, इतकेंच नव्हे तर अन्याय्य वाटतो आणि कादंबरीलेखनाच्या मूळ हेतुलाच बाध

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

येतो. चंद्रशेखरचें स्वभावरेखन स्पष्ट आहे. तितकें तें विदुलेचें नाही. 'उदात्त व पवित्र प्रेमाची भूक' हा तिच्या स्वभावाचा स्थायिभाव मानतां येईल. पण कादंबरींत दोन ठिकाणीं 'सत्याच्या आधारावर जीवन जगणारी' असा जो तिच्या स्वभाववैशिष्टयाचा निर्देश आहे तो निराधार वाटतो. सुरवातीच्या कांही प्रकरणांत अतिशय समंजस म्हणून वावरलेली विदुला तिच्या चंद्रशेखरशीं झालेल्या विवाहानंतर इतका असमंजसपणा पत्करील हें जसें अशक्य वाटतें, तसेंच परागबरोबर पळून गेल्यानंतर प्रसंगोपात्त त्याच्या मनांत निर्माण झालेल्या विकारांना तिने केलेला विरोध दुबळा वाटतो. परागवरील निरतिशय प्रेमामुळे हें घडलें असें म्हणावें तर त्याच्या हेतूच्या शुद्धतेची ग्वाही देणारा एकहि प्रसंग संपूर्ण कादंबरींत कुठेंहि नाही. त्यामुळे तिचें प्रेम अविवेकी वाटतें. 'परिस्थिती-च्या' ज्या 'कैचींत' सापडल्यामुळे तिने आडमार्ग पत्करलेला आहे त्या 'कैची'ची धार बोथट असल्याची खात्री पटते. आणि विदुला वाचकांच्या मनांत अनुकंपा निर्माण करण्यास असमर्थ ठरते.

चंद्रशेखरची आठ वर्षांची भाची–लिली–हिचा उल्लेख करणें आवश्यक आहे. चंद्रशेखर आणि विदुला यांच्यामधील खरा दुवा तीच आहे. पराग भेकड आहे. कादंबरीचा परमोच्च बिंदू (Climax) त्याच्या ह्या भेकड वृत्तींतूनच निर्माण झालेला आहे.

कांही ठिकाणचीं वर्णनें बरीं आहेत. कांही प्रसंग हृदयस्पर्शी आहेत. संवाद वाचतांना मात्र अनुभूतीचा अभाव तीव्रतेने जाणवतो.

मुखपृष्ठावरील चित्र लेखिकेने स्वतःच काढलेलें आहे व तें चांगलें आहे.

आनंदीबाईंनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची एकूण संख्या कमीच. त्यामुळे त्यांच्या कादंबरीलेखनापासून कसल्याहि प्रकारच्या अपेक्षा निर्माण होण्यापूर्वी त्यांचा त्या क्षेत्रांतील अनुभव जमेस धरावा लागेल. त्या दृष्टीने 'उन्मीलन' ही कादंबरी अपेक्षाभंग करणारी नाही.

मराठी कथेंत किंवा कादंबरींत झपाट्याने येत असलेला मनोविश्लेषणाचा प्रवाह या कादंबरींत आणतां आला असता तर ह्याच कादंबरीला आहे त्याहून उच्च स्तर प्राप्त झाला असता. कारण कथा-विषय वाईट नाही.

—ना. ठें.

टिळक आणि आगरकर

[लेखक—श्री. ना. बनहट्टी; प्रकाशक–सुविचार प्रकाशन मंडळ, कॉंग्रेसनगर, नागपूर १ व पुणें ५. पृ० ८+२३२; मूल्य—रु. ३॥]

लो० टिळकांच्या जन्मशताब्दीचे निमित्ताने त्यांचे संबंधी बरीच ग्रंथरचना झालेली आहे. परंतु लो. टिळक आणि प्रि. आगरकर यांचे संबंधी एकत्र विचार करणारें गुरुवर्य श्री. ना. बनहट्टी यांनी लिहिलेलें 'टिळक आणि आगरकर' हें एकच पुस्तक आहे असें म्हणावयास हरकत नाही. लो. टिळक व प्रि. आगरकर हे सुरवातीस एकमताचे जिवलग मित्र, परंतु तेच पुढे मतभिन्नता निर्माण होऊन एकमेकांचे कट्टर विरोधक बनले. दोन्हीहि भूमिकांमध्ये त्यांचा एकमेकांशीं इतका घनिष्ठ संबंध आला की दोघांच्याहि जीवनाचे किंवा विचारांचे सर्व पैलू स्पष्ट होण्याकरिता त्यांचा एकत्रित तौलनिक पद्धतीने अभ्यास होणें अत्यंत आवश्यक आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न करून लो. टिळक व प्रि. आगरकर यांच्याविषयीच्या अभ्यासाची एक दुर्लक्षित बाजू स्पष्ट केली ह्याबद्दल गुरुवर्य बनहट्टी यांचे आभार मानावयास पाहिजेत.

प्रस्तुत ग्रंथाचें परीक्षण करतांना तो कोणत्या दृष्टीने लिहिला गेला आहे हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. 'टिळक आगरकरांच्या प्रधान जीवनकार्याचें हें त्रोटक वैचारिक समालोचन आहे' (पृ. प्र–३) असें लेखकांनी प्रस्तुत ग्रंथाचें मर्यादित स्वरूप विशद केलें आहे व ह्या वाक्यांतील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे. केवळ चरित्र किंवा केवळ तत्त्वज्ञान किंवा दोहोंचाहि बारीकसारीक तपशील देण्याच्या भरीस न पडतां लेखकांनी टिळक–आगरकरांच्या प्रमुख जीवनप्रसंगांचें व विचारांचें तौलनिक दृष्ट्या विवेचन करून त्यांतून कांही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले आहेत. त्यामुळे हा ग्रंथ सामान्यजनांना टिळक–आगरकरांचा परिचय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करून देणारा जसा झाला आहे तसाच तो अभ्यासकांना विचारप्रदहि झाला आहे.

ह्या विचारप्रद भागाचा येथे उल्लेख करणें आवश्यक आहे. टिळक-आगरकरांच्या जीवनाला जो 'विशिष्ट आकार प्राप्त झाला त्याला मराठी समाजाची पूर्वावस्था बऱ्याच प्रमाणांत जबाबदार आहे' ही गोष्ट लक्षांत घेऊन प्रा. बनहट्टी यांनी १८८० पूर्वीच्या तीन पिढ्यांच्या महाराष्ट्रीय इतिहासाचा व त्यांतील प्रमुख 'पूर्वगामी शिल्पकारांचा' परामर्ष घेतला आहे. 'सर्वांगीण सुधारणावाद शिक्षितांच्या पहिल्या पिढींत उद्भवला, दुसऱ्या पिढींत परिपक्व झाला आणि तिसऱ्या पिढींत वठूं लागला......देशाभिमानी संप्रदाय शिक्षितांच्या तिसऱ्या पिढींत चिपळूणकरांच्या द्वारा परिस्फुट झाला आणि नवतरुणांना त्याने आकृष्ट केलें; इतकेंच नव्हे, तर आबालवृद्ध, पांढरपेशा जनतेचीं मनें त्यानें काबीज केलीं.' (पृ. ४३) टिळक-आगरकरांचे जीवनमार्ग अशा रीतीने पूर्वेतिहासांतून निर्माण झाले हें ह्या ग्रन्थांत उत्कृष्टपणें दाखविण्यांत आलें आहे. तथापि ही पार्श्वभूमि विशद करण्याकरितां २२२ पृष्टांपैकीं ४८ पृष्टें खर्चीं घालणें जरा प्रमाणाबाहेर झालें असें मात्र म्हणावेंसें वाटतें. पूर्वेतिहासाबरोबरच टिळक-आगरकरांचें बालपण ज्या परिस्थितींत गेलें व त्यांचेवर जे संस्कार झाले त्यांचाहि त्यांच्या आयुष्यावर कसा परिणाम झाला हेंहि प्रस्तुत ग्रन्थांत उत्तम रीतीनें सांगितलें आहे. (पृ. ४९ ते ५२)

टिळक-आगरकर चरित्रांतील कांही विवाद्य प्रश्नांवरहि लेखकांनी उद्बोधक प्रकाश पाडला आहे. उदाहरणार्थ, टिळकांनी डे. ए. सोसायटी सोडली ती स्वभावभेद किंवा प्रकृतिभेद किंवा व्यक्तिद्वेष यांमुळे नसून त्याला 'तत्त्वाचा किंवा मूलभूत विचारसरणीचा भेदच कारणीभूत झाला' असें लेखकांनी ठासून सांगितलें आहे. चिपळूणकरांच्या 'स्वातंत्र्याकांक्षी देशाभिमानी पंथाला' सोसायटी पारखी होत चालली होती, हेंच तें मध्यवर्ती कारण होय असें त्यांनी समर्पक दाखले देऊन प्रतिपादन केलें आहे. (पृ. ७७ ते ७९). तसेंच आगरकरांचें वैशिष्ट्य सुधारकपणा हें समजण्यांत येतें, परंतु त्यांचें खरें वैशिष्ट्य बुद्धिवाद हें होय हेंहि यशस्वीपणें दाखविण्यांत आलें आहे. (पृ. १०८ ते ११४) तथापि सुधारकाणापायीं आगरकरांच्या बुद्धिवादाला दोन महत्त्वाच्या मर्यादा पडल्या हेंहि लेखकांनी मार्मिकपणें दाखविलें आहे. एक राजकीय प्रगतीविषयी तीव्र कळकळ असूनहि सामाजिक सुधारणा कायम होईपर्यंत परकीय राज्याचें 'प्रजापण' आपण स्वीकारावें हें आगरकरांचें मत. (पृ. ११५-११६) ह्यामुळेच ते हळूहळू नेमस्त पक्षाशीं समरस होत गेले. आणि दुसरें, सामाजिक सुधारणेचा आगरकरांनी इतका हव्यास घेतला की लोकशाहीवर विश्वास असूनहि सामाजिक सुधारणा जनतेवर खुशाल लादावी, ह्या बाबतींत त्यांचे मतांची मुळीच तमा बाळगूं नये असें त्यांनी प्रतिपादन केलें. (पृ. २१३)

आगरकरांप्रमाणेच टिळकांनाहि सामाजिक सुधारणा पाहिजे होती; योग्य प्राचीन परंपरांना राखून ही सुधारणा व्हावी असें त्यांचें मत असे. त्यामुळें पुराणप्रियतेचा जो आरोप लोकमान्यांवर केला जातो तो योग्य नव्हे. तथापि ह्या बाबतींत लोकमान्यांचे अनुयायी लोकमान्यांइतकें तारतम्य व समतोलपणा दाखवत नसत. आणि 'शिष्यापराधे गुरोर्दण्डः' ह्या न्यायाने टिळकहि पुराणमताभिमानी समजले जाऊं लागले असें लेखकांनी सुचविलें आहे. (पृ. १५४-१५५)

लो. टिळकांनी चिपळूणकर संप्रदायाचें अनुसरण करून राजकीय स्वातंत्र्य हें ध्येय मानलें व त्याकरिता देशांत त्याप्रमाणेच विलायतेंत अशी दुहेरी चळवळ करणें आवश्यक आहे असें त्यांचें मत होतें. परंतु पुढे १९२० नंतर गांधीजींचे हातीं राजकीय चळवळीचीं सूत्रें आल्यावर त्यांनी विलायतेंतील चळवळ बंद केली. टिळक व गांधी यांच्या दृष्टिकोनांतील हा सामान्यपणें लक्षांत न येणारा फरकहि लेखकांनी योग्य शब्दांत दाखविला आहे. (पृ. १६९)

लोकमान्यांचा साधनांच्या अनेकतेवर विश्वास होता. बहिष्कार, करबंदी, संप, कायदेभंग, असहकारिता, सत्याग्रह इत्यादि पुढे प्रसिद्धीस आलेले मार्ग लोकमान्यांच्या द्रष्टेपणाला १९०५-६ मध्येच दिसले होते. लोकमान्यांच्या लेखांतील वाक्यें उद्धृत करून ही गोष्ट लेखकांनी उत्तम प्रकारें सिद्ध केली आहे. (पृ. १८६-७)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तथापि 'एका सशस्त्र हिंसात्मक प्रयत्नाखेरीज बाकी सर्व प्रकारचे उपाय त्यांनी कल्पिलेले व प्रतिपादिलेलें आढळतात' हें विधान मात्र बरोबर नाही असें म्हटलें पाहिजे. लो० टिळकांचा क्रांतिकारकांशीं संबंध होता ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे, तसेंच शक्य असतें तर सशस्त्र उठावणीलाहि त्यांनी चालना दिली असती ह्याबद्दलहि अनेक आधार दाखवितां येण्यासारखे आहेत. तेव्हा सशस्त्र क्रांतीचा मार्ग त्यांनी कल्पिला देखील नव्हता असें म्हणता यावयाचें नाही. तथापि हिंसात्मक चळवळींसंबंधीं लेखकांचें मन मुळांतच प्रतिकूल असावें असें वाटतें. '१८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध सरंजामशाहीला संरक्षण देणारें होतें.' (पृ. १७) किंवा 'वासुदेव बळवंत फडके यांच्या उठावणीला जनतेचें साहाय्य असणें शक्य नव्हतें' (पृ. २१) इ. गोष्टींवर लेखकांनी ह्यामुळेच भर दिला असावा.

१८९३ च्या हिन्दुमुसलमानांच्या दंग्यांच्या मुळाशीं ब्रिटिशांचें 'फोडा आणि झोडा' हें तत्त्व जसें होतें त्याचप्रमाणे १९०७ च्या सुरतेच्या कॉंग्रेसमध्ये नेमस्त व जहाल यांच्या कलहाचे मुळाशीहि हेंच ब्रिटिश भेदनीतीचें तत्त्व होतें ही एक महत्त्वाची गोष्ट प्रा. बनहट्टी यांनी प्रतिपादन केली आहे. (पृ. १८९)

प्रा. बनहट्टी यांचे ग्रंथांतील बहुंशी नूतन व महत्त्वाचे वाटणारे विचार येथवर दिले आहेत. क्वचित् ठिकाणीं ह्या विचारांशीं आम्ही सहमत नसलों तरी टिळक आगरकरांच्या अभ्यासकांना सामान्यपणें ते मार्गदर्शक होतील ह्याबद्दल शंका नाही.

लेखकांनी केलेलीं इतर कांही विधानें मात्र मान्य होण्यासारखीं नाहीत. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेच्या वेळीं विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्याकांक्षी जाज्वल्य देशाभिमानी तत्त्वें रुजविण्याचा विचार टिळकआगरकरांचे मनांत नव्हता असें लेखकांनी विधान केलें आहे. (पृ. ३८) परंतु हें विधान बरोबर नाही. ह्या विधानाला बाधा आणणारें टिळकांचे बाबतींत एक स्पष्टीकरण खुद्द लेखकांनीच पृ. ७८ वर केलें आहे. (१ ला परिच्छेद). टिळक–आगरकरांनी कॉलेजला इंग्रजाचें नांव दिलें किंवा राज्यकर्त्यांची सुरवातीचे काळांत मनधरणी केली हा एक डाव होता; त्यांतून ध्येयविस्मृतीचा निष्कर्ष काढणें बरोबर नाही.

परिस्थितीनुरूप लो. टिळकांनी आपल्या लिखाणांतून राजनिष्ठेचीच भाषा वापरली आहे. विशिष्ट काळांत धोरण म्हणून असें बोलणेंच योग्य आहे ह्या प्रामाणिक समजुतीनेच त्यांनी अशी भाषा वापरली. परंतु अंतिम तत्त्व म्हणून हेंच त्यांना मान्य होतें असें मुळीच म्हणतां यावयाचें नाही. त्यांत तोंडदेखलेपणा होता हें अगदी स्पष्ट आहे. पूर्ण स्वातंत्र्य हेंच लोकमान्यांचें ध्येय होतें. ब्रिटिश बाहुटयाखालील स्वराज्य ही बोलावयाची भाषा किंवा ध्येयपूर्तीची पहिली पायरी होती. त्यामुळे लो. टिळकांचें 'हें राजनिष्ठेचें प्रतिपादन तोंडदेखलें होतें असें नाही' हें विधान बरोबर वाटत नाही. 'तें धोरण म्हणून प्रामाणिकपणें अवलंबिलेलें होतें' हें विधान मात्र बरोबर आहे. (पृ. १६०) तसेंच लो. टिळक आज असते तर त्यांनी राष्ट्रकुटुंबाच्या सदस्यत्वाला मान्यता दिली असती ह्या कल्पनेंतहि स्वारस्य नाही. (पृ. २११) लेखकांनी स्वतःच तिरस्कृत केलेला 'आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ' (पृ. ६८) ते या ठिकाणीं खेळत आहेत.

टिळकांचे विरोधक महाराष्ट्रीय होते ह्याचा आधार घेऊन "मराठी माणसाचा कट्टा शत्रु मराठी माणूसच असावयाचा हें ठरून गेल्यासारखें असतें" असें सामान्य विधानहि लेखकांनी केलें आहे. (पृ. १५७) मराठी समाजाबद्दल असेच अनुदार विचार पृ. ९४ व १४९ वरहि आहेत. कांही प्रसंगांचा आधार घेऊन कोणत्याहि जमातीला सरसहा कांही दोष चिकटविणें अयोग्य आहे. ह्यासंबंधीं श्री. चिंतामणराव देशमुख, यांनी लोकसभेमध्ये नुकतेंच जे विचार प्रकट केले ते खरोखरच मननीय आहेत. असो, परंतु असे दोष प्रस्तुत ग्रंथांत फारसे नाहीत.

प्रस्तुत ग्रंथांतील 'प्राप्य वरान्निबोधत' हें शेवटचें प्रकरण तर अप्रतिम वठलें आहे. ग्रंथासंबंधीची अपेक्षा ह्या प्रकरणांत पूर्ण होते. ह्या प्रकरणांतील विवेचन म्हणजे सर्व ग्रंथाचें सार आहे. ह्यांतील मुख्य प्रतिपादन असें : लोकमान्य टिळक हे पूर्ण स्वातंत्र्यवादी होते. परंतु

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुधारणा होऊन जाईपर्यंत तरी आपलें पारतंत्र्य कायम राहावें असें आगरकरांना वाटत होतें. टिळक लोकशाहीवादी होते तर आगरकर व्यक्तिस्वातंत्र्यवादी असूनहि जनतेवर सुधारणा लादण्यास हरकत नाही असें म्हणत होते. असें असलें तरी टिळक सुधारणाप्रिय होते, आणि आगरकरहि स्वातंत्र्यवादी होते. दोहोंमध्ये मतभेद 'आधी काय ?' ह्यासंबंधी होता आणि इतिहासानें टिळकांची बाजू बरोबर होती हें अचूकपणे दाखविलें आहे. आगरकर बुद्धिवादी होते तर टिळकहि बुद्धिवादी होते. टिळकांची अध्यात्मता ही त्यांच्या बुद्धिवादानेंच सुचविली होती, कारण 'निवळ ऐहिकता आणि निवळ बुद्धिवाद हे नीतिन्यायादिकांच्या अंतिम कसोटीच्या दृष्टीनें पंगू ठरतात' (पृ. २१९) अशा रीतीनें टिळकांमध्येंच बुद्धिवादाची परिणतावस्था दिसते. हा अध्यात्मवाद आगरकरांनाहि क्वचित् स्पर्शून गेला आहे. (पृ. २२०) अशा प्रकारें टिळक-आगरकरांच्या जीवनाचें व विचारांचें समालोचन करून 'उत्तिष्ठत जाग्रत । प्राप्य वरान् निबोधत ।' हा बोध त्यांचेपासून वर्तमान भारतानें घ्यावा असें लेखकांनी सांगितलें आहे.

—श्री. गो. का.

ग्रामीण साहित्याचा एक सुंदर नमुना

बनगरवाडी

लेखक—व्यंकटेश माडगूळकर; प्रकाशक—मौज प्रकाशन, मुंबई ४, किमत २॥ रुपये

व्यंकटेश माडगूळकरांच्या कथा माणदेशांत जन्मास आल्या. माणदेशची माती घेऊन त्यांनी आपलीं नवीं पात्रें घडविलीं आणि त्या नव्या, छोटयाशा पण प्रामाणिक आणि आशयपूर्ण अशा कथाविश्वानें रसिकांच्या मनालाहि भुरळ पाडली. प्रादेशिक व ग्रामीण म्हणून तत्पूर्वी मिरविणारा जो पुष्कळसा 'शहरमा बनेलो' माल होता त्याचें रूपरंग आणि वाण रसिकांच्या लक्षांत येऊं लागला होता. त्याचा हिणकसपणा जाणवत होता. त्यामुळे हें जाड पण भरल्या पोताचें सणंग, लवकर न विरणारें हें नव्या वाणाचें ठाण पाहून रसिक मनोमन हरखला. त्यानें पारखलें की बहुता दिसानें 'गावांकडली माणसें' भेटायला आलीं. या गावाकडल्या माणसांनी पुष्कळ तऱ्हेतऱ्हेच्या गंमती दाखविल्या आणि नव्या गमती दाखविण्याचें आश्वासनहि दिलें. या नव्या गमतीचा एक छोटासा मासला म्हणजेच आज नजरेच्या टप्प्यांत आलेली ही बनगरवाडी.

आजकालच्या पुष्कळ ग्रामीण वा प्रादेशिक कथांपेक्षा सरस व सकस अशी ही कथा मराठी वाचकांना आवडल्याशिवाय राहणार नाही. 'बलदंड' समजल्या गेलेल्या लोकांच्या देशांतलेंच बनगरवाडी हें छोटेंसें गांव आणि नांवाप्रमाणेंच या गांवची वस्ती बहुतांशी बनगरांची व थोडीबहुत बेरडांची. एखादा दुसरा मुलाणीही त्यांत दिसतो (व बकरें कापावयाच्या उपयोगी म्हणून गांवहि त्याला ठेवून घेतो.) एकंदरींत हीं चित्रें बहुतांशीं समाजांतल्या तळाचा गाळ म्हणून समजल्या जाणाऱ्यांचीं पण त्यांतला 'आशय' किती भव्य ! या बनगरवाडीचा मुखंड समजला जाणारा प्रेमळ व करडा कारभारी आणि त्याची काळीसांवळी मुरड मुरड मुरडणारी नात अंजी, गाडगेंभर 'बुचडाचे' रुपये जमवणारा रामा आणि मेंढराच्या कळपांतून आपलें मेंढरू अचूक हेरणारा त्याचा सत्तर वर्षांचा बाप काकुबा, थोड्याफार चोऱ्या करून त्यावर जगणारा आणि दोनतीन दिवसांनी आपली चोरी कबूल करणारा आनंदा बेरड, लांडग्याला एकटा ठोकणारा बारातेरा वर्षांचा सत्ता आणि आता पोरगा कामाला लागला म्हणून त्याला शाळेंतून काढून धंद्यांत घालणारा बिरा, बैल मिळत नाही म्हणून स्वतः नांगराला जुंपून तीनचार एकर शेत एकदोन दिवसांत नांगरून टाकणारी, नवऱ्याचें मन अंजीवर गेलें म्हणून दुसरी चूल मांडणारी पण अंजी गेल्यावर आपलें माणूस परत मिळालें म्हणून आनंदणारी शेकूची मुंडाहात उंच बायको अशा कितीतरी व्यक्ति आपल्या वैशिष्टयाच्या गोष्टी सांगतांना या बनगरवाडींत दिसतील. या साधारणांचीं सुखदुःखें आणि हर्षखेद यांचे तीव्र, उत्कट उमाळेहि जागजागीं आढळतील.

आणि हें नवें जग स्वतःच्या लेखणींतून चित्रित करणारा शाळामास्तर तर या विश्वाचा केंद्रबिंदु ठरेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वनगरवाडीचें हें सारें चित्र त्याच्यामुळे आशयपूर्ण झालें. त्या वाडीच्या जीवनाला एक नवा अर्थ आला. पोरवजा वाटणाऱ्या या मास्तराने त्या वाडींत जी कामगिरी केली, प्रत्येकाच्या उपयोगी पडून त्याने त्या वाडीची जी प्रतिष्ठा वाढविली त्यामुळे कळत नकळत त्याच्या स्वतःच्या व्यक्तित्वाला कमी प्रतिष्ठा आलेली नाही. पण ही सारी गोष्ट त्यानें स्वतःच लिहिली असल्यामुळे त्याचें कर्तृत्व विशेष बोलकें होऊं शकलें नाही व ही गोष्ट रसिकाला थोडी हुरहूर वाटावयाला लावील अशीच आहे. अशाच वेळीं या आत्मनिवेदनाच्या शैलीचा अपुरेपणा जाणवतो आणि ललितवाङ्मयांत शिरलेला 'मी' वस्तुनिष्ठ दिग्दर्शन करण्याच्या कामीं कशी अडचण उत्पन्न करूं शकतो तेंहि लक्षांत येतें. शाळामास्तराच्या आत्मनिवेदनाच्या ज्या स्वरूपांत ही वनगरवाडी आपल्यापुढे आज उभी आहे त्याहून भिन्न स्वरूपांत असती तर विचाऱ्या शाळामास्तराचें मुकें वाटणारें कर्तृत्व जरा बोलकें झालें असतें आणि वाचकांनाहि तें ओळखावयास आज जी अडचण जाते ती गेली नसती.

पण याच निवेदनशैलीमुळे आजची बनगरवाडी जास्त ठळक व ठसठशीत स्वरूपांत आपणास दिसते हेंहि विसरून चालतां येत नाही.

पुस्तकाचें बाह्यांग, मजकुराची आकर्षक मांडणी आणि त्याला सुबक रेखाचित्रांची दिलेली जोड याबद्दल प्रकाशकाचें विशेष अभिनंदन करावेंसें वाटतें. अशा सुंदर व सुबक प्रकाशनामुळे मराठींतील प्रकाशनाचा दर्जा निश्चित उंचावला आहे. म्हणूनच प्रामाणिक व सकस कथा दिल्याबद्दल जसें श्री. माडगूळकरांचें तसेंच सुबक व आकर्षक छपाई करून वाचकांपुढे ती सुंदर स्वरूपांत आणल्याबद्दल 'मौज प्रकाशना'चेंहि अभिनंदन आर्षवून करावेंसें वाटतें. अशींच सुबक प्रकाशनें 'मौज' कडून वेळोवेळीं मिळोत, अशी इच्छा प्रगट करावीशी वाटते.

भिल्ल वीर कालिंग

लेखक--गो. नी, दांडेकर, प्रकाशक-प्र. दि. वेदरकर, महाराष्ट्र प्रकाशन अमरावती. मूल्य २ रु.

१२ ते १८ वर्षांच्या किशोरांना सकस व सद्‌गुणसंवर्धक वाङ्मय द्यावें या उद्देशाने निघालेल्या मंगल कथामालेचें हें पहिलें पुष्प अमरावतीच्या महाराष्ट्र प्रकाशनाचे संचालक श्री. वेदरकर यांनी प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाचे लेखक श्री. दांडेकर मराठीच्या वाचकांना कादंबरीकार या नात्याने चांगलेच परिचित आहेत. त्यांनी आपल्या कुशल लेखणीने, चमकदार संवादाने आणि चटकदार भाषाशैलीनें नटविलेलें हें भिल्ल वीर कालिंगाचें चित्रण किशोरांच्या मनाचा चांगलाच ठाव घेईल यांत शंका नाही.

विंध्यपर्वताच्या कुशींत नर्मदातटाकींच्या निबिड वनांत, वाघांलांडग्यांच्या शेजाराने राहणाऱ्या या भिल्लांच्या वस्तींत शकांचा हल्ला कसा झाला आणि त्यावेळच्या निर्दय व भयानक दृश्याचा मनावर विलक्षण परिणाम होऊन एक भिल्लपुत्र त्या शकांचा सूड घेण्यास कसा सरसावला याचें रोमहर्षक चित्रण मनाला थरारून सोडतें आणि अखेरीस तो त्याच विंध्यप्रदेशांत भिल्लांना धनुर्विद्या शिकवून शकांची दाणादाण करून सोडतो व आपल्या वहिणीला व तिच्या मैत्रिणीला सोडवितो तेव्हा मन कसल्या तरी विलक्षण आनंदाने भारून जातें. भिल्ल वीर कालिंगाचा छोटा भाऊ तंगा, वहीण चूली, आई मोवा, गुरु भोजदेव आणि त्याला धनुर्विद्या शिकण्यास उत्तेजन देणारा व एखाद्या मोठ्या भावाप्रमाणे त्याचें पाठिराखेपण करणारा वृद्धभिक्षू कूटदन्त हीं सारींच पात्रें मोठ्या कुशलतेनें रेखाटलीं आहेत. विशेषतः या भिल्लाच्या पोटावर ममतेचा वर्षाव करणारा उज्जयिनीचा विष्णुशर्मा, त्याला प्रेमळपणे धनुर्विद्या शिकविणारे आचार्य भोजदेव आणि भिक्षु कूटदन्त हीं पात्रें विशेष संस्मरणीय आहेत. ७ व्या प्रकरणापासून वर्णनशक्तीला बहर येत येत १२ व्या प्रकरणांत तर तिचा विशेष उत्कर्ष झालेला आहे.

अद्‌भुत आणि इतिहास यांचा सांधा जुळविणारी; विद्येची आस्था व पराक्रम यांचें रसभरित वर्णन करणारी आणि प्रसंगीं श्रीमंत व संपन्न नागरिकांच्या पोटावर मात करणाऱ्या एका भिल्ल पुत्राची कथा सांगून उपेक्षितांचा सन्मान करणारी ही कथा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किशोर वाचकांच्या हातांत पडेल अशी त्यांच्या पालकांनीहि दक्षता घ्यावी. आपल्या मुलांना चांगलें वाङ्मय देऊं इच्छिणाऱ्या पालकांचा प्रश्न या मंगल कथामालेने चांगल्या रीतीने सोडविला आहे.

विदर्भाच्या प्रांतांत प्रकाशनसंस्था फारशा नाहीत आणि त्यांतहि बालवाङ्मयाचें कोडकौतुक करणाऱ्या संस्था जवळजवळ नाहीतच. हा अभाव आपल्या अस्तित्वाने मिटवूं पाहणाऱ्या आणि एका विशिष्ट ध्येयवादाने प्रेरित होऊन सुवक प्रकाशन करणाऱ्या 'महाराष्ट्र प्रकाशना'चें अभिनंदन करावें तितकें थोडेंच. अशींच सुंदर व सुबक प्रकाशनें घेऊन महाराष्ट्र प्रकाशन पुनः पुन्हा वाचकांच्या भेटीला येवो अशी इच्छा प्रदर्शित केल्यावाचून राहवत नाहीं.

कॉलेजजीवनाच्या पार्श्वभूमीवरील स्वप्नाळू प्रेमिकाची कथा

दोन बहिणी

लेखक : ज्ञानेश्वर नाडकर्णी, प्रकाशक—मनीषा प्रकाशन, किंमत २ रु.

१९५५ च्या आक्टोबर ते डिसेंबर या तीन महिन्यांच्या दरम्यान मुंबईच्या आकाशवाणी केंद्रावर ध्वनिक्षेपित झालेली आणि अनेक श्रोत्यांनी पत्ररूपाने वाखाणलेली ही कथा मुंबईचे उदयोन्मुख चित्रकार श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या कुशल लेखणींतून बाहेर पडलेली आहे.

तारुण्यांत पदार्पण करणाऱ्या भावनावश जीवांची प्रीतिकथा आणि तिला कॉलेजजीवनाची मिळालेली स्वप्नरम्य पार्श्वभूमि हीं या कथेचीं दोन चटकदार वैशिष्ट्यें आहेत. पण त्याबरोबरच वास्तवाचें केलेलें चित्रणहि कमी हृद्य नाही.

मॅट्रिकच्या परीक्षेच्या ऐनवेळीं झालेल्या वडिलांच्या मृत्यूमुळे बावरलेला, कॉलेजांत प्रवेश होणार म्हणून आनंदलेला, तोरण्यांच्या घरांत शिकवणीच्या निमित्ताने जाणारा आणि रंजनेच्या प्रेमांत न कळत सापडलेला दिवाकर हा या कथेचा नायक असून त्याच्या स्वप्नाळू, उन्मादक आणि विकारवश मनाचें चित्रण ही या कथेची मध्यवर्ती कल्पना होय. पण दिवाकराच्या या चित्रणाइतकेंच आपणाकडे विशेष लक्ष वेधून घेणारीं वास्तवपूर्ण चित्रणेंहि कमी नाहीत आणि तीच कदाचित् अनेक वाचकांना अधिक आवडणारीं ठरतील. बारा मास वाहणाऱ्या नदीप्रमाणे सदैव प्रफुल्ल असणारी ताई, वडिलांच्या मागे मुलाची काळजी करणारी आणि संसाराचा भार शिरावर घेणारी कर्तृत्ववान आई, दिवाकराच्या कॉलेजप्रवेशाचा मार्ग सुकर करूं पाहणारे आगटेमास्तर, कॉलेजांत विद्यार्थ्यांवर वडिलांप्रमाणे ममतेची पाखर घालूं पाहणारे प्रा. ब्राऊनसाहेब, बऱ्यावाईट अनुभवाचें पाणी प्यालेला आणि नवशिक्या पोरगेल्या कारकुनांना सल्ला देण्याचें आपलें काम आहे असें समजून वागणारा पोतनीस या विविध चित्रांच्या साह्याने गुंफली गेलेली ही कथा स्वप्न आणि वास्तव या दोन्हींच्या संगमावर वाचकांना उभी करते. स्वप्नाळूपणा आणि व्यवहारी मन या दोन्हीचें चित्रण करण्यांत श्री. नाडकर्णी यांनी चांगलेंच कौशल्य दाखविलें आहे यांत शंका नाही.

पण गंमत अशी की खुद्द कथानायक दिवाकर याच्या मनाला मात्र या वास्तवतेचा यत्किंचितहि स्पर्श झालेला दिसत नाहीं. प्रेमभंगाने दुखावलेला हा तरुण दुसरी एखादी पोरगी भेटली तर खुशाल डोळे मिटून त्याच प्रणयपथावर झुलवीत नेला जातो आणि पुनः एकदा तोल गेला की विव्हळून आपल्याच दुःखांत मग्न होतो, जगावद्दल त्याचें मन विटून जातें आणि या दुःखापासून सुटका करण्यासाठी धर्मांतर करण्याचा विचारहि त्याच्या मनांत आल्याशिवाय राहत नाही. त्या मानाने तोरण्यांची मोठी मुलगी अंजलि किती समजूतदार, प्रगल्भ व प्रेमळ वाटते आणि अखेर दिवाकराची तिच्याशी गांठ पडून त्यांचें मनोमय मीलन सुखाचें झालेलें दाखविलें असलें तरी त्यामुळे विचारी वाचकांचें मन समाधान पावत नाही. आकाशवाणी केंद्रावर ध्वनिक्षेपित होत असतांना ही कथा कांहींना आवडली नाही याचें मर्म आमच्या मतें हेंच होय.

दिवाकराच्या स्वप्नाळू व विकारवश स्वभावाच्या मानाने अंजलीचें चित्र जास्त हृद्य व लोभस वाटतें आणि या पोरीचा परिचय जितका व्हावयास हवा होता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याहून फारच कमी प्रमाणांत तो करून दिल्याबद्दलहि कांही रसिक नाखूप झाल्याशिवाय राहणार नाहीत. पण एका अर्थाने पाहतां हा लेखकाच्या चित्रणकौशल्याचा निश्चित पुरावाच म्हणावा लागेल. आणि म्हणूनच आपल्या पहिल्यावहिल्या कादंबरीने रसिकांचें मन वेधून घेणाऱ्या या कादंबरीकाराचें विशेष अभिनंदन आम्हाला करावेंसें वाटतें.

भा. श्री. प.

संतवाणीचा अमृतकलश

लेखक : भा. पं. बहिरट, एम्. ए.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे श्री. भा. पं बहिरट ह्यांच्या वेळोवेळीं भिन्न भिन्न मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या फुटकळ लेखांचा संग्रह होय. ह्यांत एकूण १७ लेख असून त्यांपैकी एकूण ८ लेख संतवाङ्मयाची शिकवण विशद करणारे आहेत व ५ लेख धर्म व तत्त्वज्ञानपर आहेत. ह्याशिवाय इतरहि कांही लेख आहेतच. परंतु धर्म, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांपेक्षा, संतवाङ्मयांतील शिकवणीवरील लेख जास्त असल्यामुळे ह्या पुस्तकाला जें 'संतवाणीचा अमृत-कलश' हें नांव देण्यांत आलें आहे तें सार्थच आहे.

श्री. बहिरट हे आंग्लविद्याविभूषित असूनहि संतवाङ्मयावर त्यांचें नितांत प्रेम आहे. त्यांचा संतविषयक दृष्टिकोन निरोगी व प्रेमळ स्वरूपाचा असून त्याला प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाच्या सखोल व्यासंगाचा आधार मिळाला आहे. ह्यामुळे त्यांचें विवेचन अतिशय सूक्ष्म व मार्मिक उतरलें आहे. मात्र ह्या पुस्तकांत चर्चिलेल्या विषयाचें गंभीर स्वरूप पाहिल्यानंतर ह्यावरील हे लेख अतिशय त्रोटक स्वरूपाचे झाले आहेत असें म्हणावें लागतें.

श्री. बहिरट हे वारकरी पंथाचे अभिमानी आहेत. किंबहुना हा अभिमान कांहीसा अतिरेकी स्वरूपाचा झाला आहे असें म्हणणें अधिक योग्य होईल. वारकरी पंथावरील उत्कट प्रेमामुळे त्यांचीं कित्येक विधानें व तदनुसार करण्यांत आलेले विवेचन कांहींसें एकांगी व इतर पंथीयांना अन्यायकारक झालें आहे. वैदिक धर्म व भागवतधर्म, भागवतधर्म व रामदासीपंथ, भागवतधर्म व महाराष्ट्रधर्म ह्यावर लिहितांना ज्या तुलनात्मक अभ्यासपद्धतीची कास धरण्यांत आली, ती पद्धतच अयोग्य आहे असें आम्हास वाटतें. ह्या तीन्ही लेखांतून असा आशय निघतो की ह्या तीन्ही संप्रदायांचीं मूळ ध्येयें भिन्न असून भागवत संप्रदायाचें ध्येय सर्वश्रेष्ठ आहे. "कनिष्ट ध्येयाप्रमाणेच वैदिक धर्माच्या आचाराची कल्पनाहि कनिष्ठतेचीच आहे." (पृ. ५२) असे उद्गार लेखकांनी काढले आहेत. त्याचप्रमाणे समर्थ रामदासांना त्यांची जातिनिष्ठा, भिक्षावृत्ति, प्रपंचपराङ्मुखता व क्षुद्रदेवतार्चन ह्याविषयी दोष दिला आहे. (पृ. ६० ते ७१).

वस्तुतः कशाला श्रेष्ठ म्हणावें व कशाला कनिष्ठ म्हणावें ह्याचें निश्चित गमक शोधून काढणें कठीण आहे. खुद्द गीतेंत सुद्धा विवेचनाच्या ओघांत कधी योगी श्रेष्ठ तर कधी भक्ति श्रेष्ठ असे उद्गार भगवंतांनी काढले आहेत. तुकारामासुद्धा सर्वच वारकरी संतांनी वेदांविषयी पूज्यबुद्धि व्यक्त केली आहे. एवढेंच नव्हे तर "वेद बाह्य लंड, जो बोले पाखांड। त्याचें काळें तोंड संतांमध्ये" असें स्पष्ट बजावून "आम्ही वैकुंठवासी। आलों याच कारणासी। बोलिले जे ऋषि। साच धावे वर्ताया॥" म्हणजे ऋषिमुनीनें सांगितलेले जुनें ज्ञान पुनः नव्याने सांगण्याकरता आम्ही अवतरलों आहोंत अशीहि साक्ष दिली आहे. शिवाय वारकरी पंथाला मान्य असलेले गीता व भागवत हे दोन्ही ग्रंथ वेदांविषयी कितीतरी आदर बाळगून बोलतात हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. अर्थात हा श्रेष्ठ-कनिष्ठ वाद खुद्द भागवतधर्मालाहि मान्य होण्यासारखा नाही म्हणून तो व्यर्थ व त्याज्य समजणें उचित होईल.

आज महाराष्ट्रांत तर अशी स्थिति आहे की सर्व भिन्न भिन्न पंथीयांनी आपल्या मूळच्या उपासना-मार्गाशीं एकनिष्ठ राहूनच वारकरी पंथाला उचलून धरलें आहे. कोणताहि महाराष्ट्रीय कीर्तनकार—मग तो स्वतः कोणत्याहि पंथाचा असो-निरुपणाच्या ओघांत ज्ञानेश्वर तुकारामादि वारकरी संतांचीं वचनें मोठ्या प्रेमानें व आवडीने उद्धृत करतो. त्यांच्या समोर ह्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रेष्ठ व हा कनिष्ठ असा भेदभाव नसतो. ज्ञानेश्वर स्वतः नाथपंथी असूनहि त्यांनी वारकरी पंथालाच उचलून धरले ह्याचें कारण कोणतें हा प्रश्न स्वतंत्र आहे. परंतु नाथपंथ हा कनिष्ठ व वारकरीपंथ श्रेष्ठ ही भावना त्यांच्या मनांत केव्हांहि नसावी. परंपरेने चालत आलेल्या स्वतःच्या' आवडत्या मार्गाला ते कनिष्ठ समजतील तरी कसें! तसें असतें तर खुद्द ज्ञानेश्वराने तो पंथ कायमचा खंडित करण्याच्या ऐवजी सत्यामल नाथाला त्याची दीक्षा दिली नसती व सत्यामेल नाथापासून तो शिवादित केसरीपर्यंत नाथसंप्रदायाची परंपराहि उत्पन्न झाली नसती.

ज्ञानेश्वराप्रमाणेच जनार्दनस्वामी व एकनाथ हे पूर्वीचे दत्तसंप्रदायी असूनहि आपल्या उपासनेशीं प्रतारणा न करतां भागवत पंथाला उचलून धरतात ह्याचेंहि कारण ही श्रेष्ठ–कनिष्ठतेची विचित्र कल्पना हें नव्हे. दत्तसंप्रदायांत कांही वैगुण्य आढळलें म्हणून त्यांनी भागवत पंथाचा पुरस्कार केला हें म्हणणें त्यांच्या एकनिष्ठ दत्तप्रेमाला केंव्हाहि रुचणार नाही, नव्हे त्यांच्या दत्तभक्तीला कमीपणा आणणारें आहे.

प्रत्येक पंथाचें कार्यक्षेत्र भिन्न भिन्न असतें. ज्या कार्यक्षेत्रांत त्यांना कार्य करावयाचें असतें, त्यांतील लोकांच्या गरजेप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें उपदेश करावयाचा असतो. नाथसंप्रदायांतील साधन–मार्ग हा समाजांतील सर्वच व्यक्तींना झेपण्यासारखा नव्हता. दत्त संप्रदाय व रामदासी संप्रदाय यांत ब्राह्मण-धर्माचा जो उपदेश केला आहे त्याचीच त्या वेळीं त्या त्या वर्गांना गरज होती. ह्या दृष्टीने दत्त संप्रदाय व रामदासी पंथ हे वर्गविशिष्ट होते हें खरें आहे. उलट वारकरी पंथाचें कार्यक्षेत्र अधिक व्यापक होतें. महाराष्ट्रांतील बहुजनसमाज हें त्या पंथाचें कार्यक्षेत्र होतें. व ह्या बहुजनसमाजाला सुलभ भक्तिमार्गाचीच गरज होती. परंतु कार्यक्षेत्र जरी कमी अधिक असलें तरी त्यावरून श्रेष्ठ कनिष्ठतेचें मापन करणें चूक आहे. व्यापकतेचा निकष लावून पाहिला तर असें दिसून येतें की नाथपंथ हा सर्व भारतवर्षभरच नव्हे तर तिबेटपर्यंत होता. व्यापक म्हणजे श्रेष्ठ नव्हे!

हा दृष्टिकोन अयोग्य आहे असें आम्हाला प्रामाणिकपणें वाटतें.

हा एक दोष सोडून दिल्यास प्रस्तुत पुस्तक हें वाचनीय व संग्राह्यच आहे. लेखकांच्या सूक्ष्म व्यासंगाची व भागवत धर्मावरील उत्कट भक्तीची साथ ग्रंथाच्या पानापानांतून प्रकट होते. मराठी सारस्वतांत एका उत्तम पुस्तकाची भर घातल्याबद्दल आम्ही श्री. बहिरट ह्यांचें अभिनंदन करतों. व त्यांनी आपलें लेखन असेंच चालूं ठेवावें अशी इच्छा प्रगट करतों.

—रा. ना. घा.

श्री हरिविजयसार

श्रीधर यांच्या हरिविजयाचें ओवीबद्ध सार

कवियित्री श्रीमती लक्ष्मीबाई ऊर्फ ताई दीक्षित, सिव्हिल लाइन्स, नागपूर. मूल्य ८ आणे.

प्रस्तुत पुस्तिका लेखिकेच्या भक्तिप्रवण मनोवृत्तींतून उदय पावली असून ओव्यांची धाटणी श्रीधरांच्याच पद्धतीवर फार गोड उतरली आहे. भाविकांनी व रसिकांनी हें सार अवश्य ग्रहण करावें.

महाराष्ट्र गीतें

कवि वा. न. घोरपडे, वर्धा. मूल्य २ आणे.

'संयुक्त महाराष्ट्रा'वरील कांही नैमित्तिक कविता प्रस्तुत पुस्तिकेंत संगृहित केल्या आहेत. 'कवि नसलेल्यांनाहि प्रसंगविशेषीं 'उमाळे' येऊं शकतात व त्यांतून 'काव्य' नसलें तरी 'कविता' प्रसवूं शकतात' अशी लेखकांनीच जी भूमिका मांडली आहे ती अगदी यथार्थ आहे. प्रस्तुत कवितांतून महाराष्ट्राच्या बद्दलचा लेखकाचा अभिमान व्यक्त होतो तो योग्य आहे. पण 'ही गुलामि गुजरायेची' वगैरे विधानें सर्वमान्य होतीलच असें नाही. आता प्रांतरचनेचा निर्णय होऊन चुकला असल्यामुळे या कवितांना केवळ ऐतिहासिक मूल्य शिल्लक राहिलें आहे. या लहानशा ११ पानी कवितांना श्री. माडखोलकर यांची ४ पानी प्रस्तावना लाभली आहे, हें विशेष.

—पां. कृ. सा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पनेचा खेळ

लेखक—श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर; प्रकाशक—द. ना. ठाकूर, ठाकूर आणि कंपनी, अमरावती. किंमत २ रु.

एकांकिका हा एक जुनाच वाङ्मयप्रकार आज मराठींत नव्या प्रतिष्ठेने मिरवूं लागला आहे. १८५० च्या सुमारास रंगभूमीच्या कोनाकोपऱ्यांत फार्सांच्या रूपाने आपला खेळ मांडून बसणाऱ्या या छोट्या बालकाला इतकें गोंडस आणि आकर्षक स्वरूप लाभेल अशी त्यावेळीं कुणाला कल्पनाहि आली नसती. किंबहुना तशी कल्पनाहि मनांत येऊं नये असा विपरीत काळ मधल्या काळांत येऊनहि गेला. त्यामुळेच कांही अंशीं केवळ मासिकांच्या पृष्ठांतच एका विशिष्ट मर्यादेंत तिला आपला संसार जगवावा लागला आणि कांहीसें 'निर्जीवते'चें जिणें तिच्या वाट्याला आलें. पण गेल्या कांही वर्षांपासून एकांकिकेला पुनः विलक्षण भाव चढलेला असून आपल्या प्रतिभेची चमक दाखविण्यास हा प्रकार योग्य असल्याबद्दलची जाणीवहि लेखकांना होऊं लागलेली दिसते. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या 'कल्पनेच्या खेळां'त ही जाणीव विशेष आढळते.

पण श्री. दारव्हेकर यांच्या या संग्रहाचें वैशिष्ट्य या नव्या जाणिवेंत नाही तर त्यांच्या तंत्रविषयक कौशल्यांत आहे. एकांकिका म्हटली म्हणजे एका अर्थी घटकेचें नाटक, पण त्या छोट्याशा घटकेपुरतेंच तिचें विश्व मर्यादित असलें तरी तिची कलात्मक शक्ति अमर्याद आहे. थोड्याशा अवकाशांत घटनेचें मर्म उकलून दाखवायचें, व्यक्तीच्या अंतरंगांतला आशय उकलून दाखवायचा, भावानुभावांचें नाट्यपूर्ण दर्शन घडवायचें, आणि हें सर्व घडवून आणतांना प्रयोगक्षमतेला ढळ तर पोचूं द्यायचा नाही, हें सारें तंत्र एकांकिकेला हाताळावें लागतें आणि श्री. दारव्हेकर यांनी तें पुष्कळच यशस्वीपणें हाताळून दाखविलें आहे. प्रस्तुतच्या संग्रहांतील पांच एकांकिकांपैकी चार एकांकिका प्रयोगासाठीच निर्माण झालेल्या असल्यामुळे त्यांत पुस्तकी संवादाची कृत्रिमता व निर्जीवता आढळूं नये हें साहजिकच आहे. उलट प्रयोगक्षमतेच्या कसोटीवर घासल्या गेल्यामुळेच जन्मतेक्षणींच त्यांना अकृत्रिमपणाचें, स्वाभाविकतेचें वरदान मिळालेलें आहे.

श्री. दारव्हेकर यांच्या या एकांकिका वाचतांना सुजाण रसिकाला जर कोणत्या गोष्टीचा विशेष प्रत्यय येत असेल तर तो त्यांच्या निरागस आणि निरोगी जीवनदृष्टीचा. मध्यमवर्गाच्या आजच्या साचेबंद, निर्जीव आणि संकुचित जीवनांतली विफलता आणि अगतिकता ते हेरूं शकतात. 'कल्पनेचा खेळ' मध्ये स्वप्नरंजनाच्या सीमेवर जाऊनहि ते वास्तवाची चाहूल घेऊं शकतात, इतकेंच नव्हे तर आजच्या उदासवाण्या वाटणाऱ्या जीवनांतील उच्चतम आनंदाचे निर्मळ कणहि ते लक्षांत घेऊं शकतात. १९५२ सालीं रसिक प्रेक्षकांकडून नावाजल्या गेलेल्या 'अक्रोडाच्या झाडां'त श्री. दारव्हेकर यांच्या प्रतिभेचें हेंच चमकदार वैशिष्ट्य प्रथम उजळून निघालें. उणेंपुरे अर्धे तप शिक्षकाच्या व्यवसायांत घालविलेल्या एका व्यक्तीच्या लेखनाला जें एका रात्रींत अवचित मोल आलें तें काय निव्वळ प्रयोगक्षमतेला, त्यांतील खटकेबाज संवादांना, तंत्रविषयक कौशल्याला की त्यांतील स्पष्ट आणि वस्तुनिष्ठ चित्रणाला?

श्री. दारव्हेकर यांच्या प्रतिभेचीं हीं वैशिष्ट्यें लक्षांत घेऊनच सुजाण रसिक त्यांच्या या संग्रहाचें हर्षाने स्वागत करतील. मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने ५०० रुपयांचें पारितोषिक देऊन या एकांकिकांचा नुकताच गुणगौरव केला. परिषदेने जशी गुणग्राहकता दाखविली तशीच रसिक वाचकहि दाखवतील यांत शंका नाही.

वर्षा

लेखक—श्री. गंगाधर गाडगीळ; प्रकाशक—लाखाणी बुकडेपो, मुंबई. किंमत रुपये ३.

नवकथाकार म्हणून गाजलेल्या श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या कथांचा हा दहावा संग्रह 'वर्षा'चें रूप घेऊन मराठीच्या वाचकांपुढे आलेला आहे. ह्या कथासंग्रहाचें उल्लेखनीय वैशिष्ट्य हें की या संग्रहांतील पुष्कळशा कथा लेखकाच्या कथालेखनांतील विकासाचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक टप्पा दाखवतात. ज्या कांही दृष्टीने गाडगीळ हे अग्रगण्य कथालेखक ठरलेले आहेत आणि म्हणूनच त्यांचें वैशिष्टच ठरलेलें आहे त्यांची गोष्ट वेगळी. पण खुद्द लेखकाला तसें वाटत नाही याची साक्ष म्हणून या संग्रहांतील 'लेखकाची गोष्ट' या कथेकडे अंगुलिनिर्देश करतां येईल.

गेल्या कांही वर्षांत गाडगिळांच्या कथेवर जे आक्षेप घेण्यांत आले त्याबद्दलची जाणीव खुद्द कथाकाराला आहे ही मोठी अभिनंदनीय गोष्ट आहे. या जाणिवेंतून अंतर्मुख विश्लेषणपद्धतीचें साह्य घेऊन ही गोष्ट निर्माण झाली असावी. ही कथा गाडगिळांची भूमिका विशद करणारी नसून दुसऱ्याच एका 'लेखक' व्यक्तीचें चित्रण आहे असाहि दावा करतां येण्याजोगा आहे. पण त्यांतील आत्माविष्काराचा रंग इतका गडद आहे की सुजाण वाचकाला गाडगिळांचें तें आत्मनिवेदनच वाटेल. ही गोष्ट खरी असेल तर गाडगिळांना आपल्या कथाविश्वाची व प्रतिभेची मर्यादा जाणवली आहे आणि त्या संकुचित विश्वांतून बाहेर पडण्याची एक विलक्षण तगमगच ते या कथेच्या द्वारें चित्रित करीत आहेत असें म्हणावयास हरकत नाही. कोणत्याहि दृष्टीने का होईना 'लेखकाची गोष्ट' हें गाडगिळांच्या कथाविश्वांतील एक नवें फडफडणारें पान आहे आणि त्यांच्या कथाविश्वाशीं परिचित असलेला वाचक अशा पानाचें नाविन्य लक्षांत घेऊन त्याचें स्वागतच करील.

'लेखकाची गोष्ट' मधला 'मी' अखेरीस स्वतः-च्या कथांसंबंधी म्हणतो, 'लिहिणें थोडें, विचार फार'. पण गमतीची गोष्ट ही की खुद्द गाडगिळांची कथा या विचारप्रधानतेपासून दिवसेंदिवस बरीचशी मुक्त होत आहे आणि त्याबरोबरच 'मी' आणि 'माझें' हें ममत्वाचें ओझेंहि ती हळुहळू दूर करीत आहे. संसारांतलीच एखादी घटना घेऊन त्यांत कुठेहि 'मीपणा' न दाखवितां कांहीशा अलिप्तपणे त्यांतली चव घेत आणि दुसऱ्याला ती चाखायला देत गाडगीळ किती सुरेख गोष्टी लिहूं शकतात याचे नमूने म्हणजे संग्रहांतील 'वासू', 'अमृत' आणि 'देवाघरचीं माणसें' ह्या गोष्टी होत. ह्या गोष्टींतून कारुण्याची गंगा खळाळत बाहेर पडते आणि मानवी जीवनांतील मर्मस्थळें हातांत येतात. चिंबलेल्या, गारठलेल्या मनाची जीवनाविषयीची अद्भुत आसक्ति 'अमृत' मधील विनतेच्या चित्रणांत किती हळुवारपणे दाखविली आहे! 'देवाघरचा माणूस' मध्येहि एक नव्हे, दोन नव्हे, कितीतरी समजदार माणसें भेटतात आणि वाटतें हीं सर्वच देवाघरचीं माणसें नव्हत का?

'पोरखेळ' आणि 'सर्कस' यांसारख्या गोष्टींत गाडगिळांच्या आंगचा खटयाळपणा जीवनांतल्या विलक्षण व विक्षिप्त वाटणाऱ्या गोष्टींतून अपार रस घेतांना आढळतो. 'परिणति' सारख्या एखाद्या कथेंत तो आपणाला स्वप्नरंजनाच्या सीमेवर नेतो, तर 'मीना' सारख्या एखाद्या कथेंत लोकविलक्षण कल्पनांच्या आहारीं जाऊन असंभाव्यतेचे व भडकपणाचे मळे पिकवतो.

सुप्त, अर्धसुप्त व जागृत अंतर्मनांतील क्रिया-प्रतिक्रियांचें चित्रण देण्याचा पायंडा गाडगिळांनी घातला असें म्हणावयास हरकत नाही. नवकथा ही, खऱ्या अर्थाने नवलकथा वाटावी अशीं कांही बीजें त्यांच्या कथेंत रसिकांना दिसलीं. या संग्रहांतील 'वर्षा' व 'उन्हाळा' या दोन कथा अशांपैकीच होत.

पण गंमत अशी की ही 'नवता' गाडगिळांच्या कथेंतून दिवसेंदिवस विरळ होत आहे की काय आणि जुन्याच चाकोरींतून ही नवकथा पुन: जाऊं लागली आहे की काय अशी भीति वाटण्याजोगीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. प्रस्तुतचा कथासंग्रह पाहून ही भीति विशेष जाणवते. ज्या नव्या दमाने त्यांनी कांही वर्षांपूर्वी पौरुषाला साजेसा हुंकार दिला, जुन्या रसिकतेला ज्याच्या बळावर डिवचलें तो 'दम' नाहीसा झाला की काय? ती झुंज घेण्याची प्रवृत्ति केवळ 'लोकप्रियते' साठी आणलेलें अवसान होतें काय? ज्याला आपण 'प्रतिभापूर्ण आशय' 'नवी कल्पकता' इत्यादि शब्दांत आळवलें ती मुळांतच उसनी व कृत्रिम होती की काय अशी शंका हा संग्रह वाचणाऱ्या गाडगिळांच्या रसिक

(पुढील मजकूर पान २६ वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन विदर्भाचें काव्य   कांही शंका

अप्रबुद्ध

युगवाणीच्या गेल्या दोन तीन अंकांत सुप्रसिद्ध श्री. नारायणराव हूड यांची संशोधनात्मक लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. संशोधक, तत्त्वज्ञ, साहित्यिक इ. अनेक भूमिकांवरून लिहिलेली ही माला वाचतांना प्रथम, कवि हूड हे 'प्राचीन कवीं'त जमा झाल्याचें पाहून वाचकांस खेद होतो; परंतु लेखक खुद्द श्री. नारायणराव हूडच हें ध्यानांत येऊन तो बुचकळ्यांत पडतो आणि शेवटीं लेखकानेच केलेलें त्याच्या 'औचित्य–भंगा'चें निराकरण वाचून समाधान पावतो.

लेखकाच्या निराकरणाप्रमाणे हा 'औचित्यभंग' त्यांना निरुपायास्तव करावा लागला असें समजतें; परंतु लेखमाला वाचणाऱ्याचा असा ग्रह होण्याचा संभव आहे कीं; ही सारी लेखमाला स्वतःची जाहिरात देण्याकरिताच आहे की काय ? तसें असलें तरी त्यांत वावगें कांहीच नाही. एकतर हें युग जाहिरातीचें आहे व दुसरें असें की कवीला आत्मश्लाघेची सनदच असते !

या लेखमालेंत वाचकांस कित्येक माहिती नवीन मिळते. वैदिक वाङ्मयांत कालानुक्रम आहे, अशी आधुनिक कल्पना आहे. तिच्याप्रमाणे प्रथम जो ऋग्वेद त्याच्या कालीं विदर्भ म्हणून देश होता, ऋग्वेदांतील कांही सूक्तें विदर्भांत रचलीं गेलीं, अगस्ति मुनींचा आश्रम विदर्भांत होता, त्याचप्रमाणे नाथांचें पैठणच नव्हे, तर नामदेवाची पंढरीहि विदर्भांतलीच इ. पुष्कळच माहिती यांत आहे. परंतु या लेखांत श्री. हूड यांनी तत्त्वज्ञान आणि साहित्य यांचा जो संकर केला आहे तो कुमारसंभवांतील शिवपार्वतीच्या शृंगारासारखा वाटतो. त्याने काव्याचा दर्जा वाढलेला आहे कां तत्त्वज्ञानाच्या भूमिकेची हानि झाली आहे, त्यांच्या गाढ चिंतनांतून निघालेल्या 'भृग सिद्धांता'ची कथा काय आहे, त्यांच्या सिद्धांतांनी तत्त्वज्ञानाचीं कोडीं खरोखरच सुटतात की काय, इत्यादिकांचें परीक्षण तज्ज्ञांच्याकडून होईलच. त्यांनी घेतलेली तत्त्वज्ञान्याची भूमिका मजसारख्याच्या नीटशी लक्षांत येत नाही. आपल्या विचारमंथनांतून त्यांनी वर आणलेला 'तमःप्रकाशा'चा सिद्धांत कांही अभिनव नाही. खाल्डी लोकांचे तियामत आणि मर्दुक अथवा पारश्यांचे अऱ्हीमान आणि आहुर्मज्द किंवा यहुद्यांचे सैतान आणि ईश्वर हे त्या कल्पनेचेच पर्याय आहेत- या नवीन सिद्धांताच्या साह्यानें त्यांनी अद्वैताची कल्पना मांडली आहे, ती जीव-शिवाच्या अद्वैताहून भिन्न आहे, असें त्यांनीच म्हटलें आहे. वेदान्तदृष्टया या कल्पनेचें परीक्षण ह. भ. प. श्री. बाबाजी महाराज पंडित अथवा ह. भ. प. श्री. सोनोपंत दांडेकर यांच्यासारख्या कोणी वेदान्त्याने अवश्य करावें, अशी माझी नम्र सूचना आहे.

मला स्वतःला श्री. हूड यांना दोनतीन लहान शंका विचारावयाच्या आहेत. त्या अशा—

(१) ले. ३ मध्ये त्यांनी असें म्हटलें आहे की, शंकराचार्यांचे बरेचसे सिद्धान्त अत्यंत मूलगामी व त्रिकालाबाधित आहेत. माझी शंका अशी आहे की वेदान्ताहून स्वतंत्र असे त्यांचे कांही सिद्धान्त आहेत काय ?

(२) त्यांचे मूलगामी नसलेले सिद्धान्त कोणचे ? व त्रिकालाबाधित नसणारे कोणचे ?

(३) श्री. हूड यांनी असें म्हटलें आहे की, 'मनुष्य जन्मामध्ये कर्म हें बुद्धिपुरःसर होत नाही' असें असेल तर--?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(४) मनुष्याला कोणत्या वर्गांत घालावयाचा ? एकादा कवी स्वतःला कदाचित देव समजला तरी सर्व माणसांना कांही त्या वर्गांत घालतां येणार नाही. त्यांना पशूंच्या वर्गांत घालावयाचें काय ? (श्रुतिमातेने माणसाला पशू म्हटलें आहे. पण तें बुद्धिदृष्टीने नाही; वासनादृष्टीने आहे.)

(५) मनुष्याचें कर्म बुद्धिपुरस्सर नसतें, तेव्हा बुद्धिपुरःसर न लिहिलेली ही माला कोणी लिहिली म्हणून समजावयाची ?

या लेखमालेंतील इतर कित्येक विधानेंहि अशींच मजसारख्याला घोटाळ्यांत टाकणारीं आहेत. उ० 'जग कार्यान्वित होण्याकरता कर्मवादाची शिकवणूक ही एक कुशल योजना आहे.' तशीच 'दुःखाला तोंड देण्याकरिता आनंदवादाची शिकवणूक हें श्रेष्ठांतलें श्रेष्ठ कर्तव्य आहे.' पण हें कर्तव्य कोणी लावून दिलें व कां मानावयाचें ? जगाला कार्यान्वित करण्याची तरी उठाठेव कोणी सांगितली ? व कां ?

ग्रंथसमालोचन

(पान २४ वरून)

वाचकापुढे उभ्या राहतात. या नव्या कथालेखकांचा दम आम्ही केव्हांच ओळखला होता, त्यांचें आव्हान फुसकें ठरेल, 'नव्या वाटा' वरील त्यांची शिदोरी लवकरच संपुष्टांत येईल असें जें भाकित जुना रसिक मनोमन करीत होता व कुंपणाशीं बसून गंमत पाहत होता त्याचें म्हणणें खरें ठरणार काय ? आणि ज्या रसिकांनी या नवकथाकारांना उचलून धरणें त्यांची अखेर फसगत होणार काय ? गाडगिळांच्या वाचकांचा, गाडगिळांना हा सवाल आहे. आणि या सवालाला जवाब देण्याचें सामर्थ्य गाडगिळांच्या प्रतिभेंत आहे हें निश्चित.

भा. श्री. प.

